14 वर्ष वर्धापन दिन

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३३० ■ मंगळवार, दि. ९ जून २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# महापालिकेचा कोट्यवधींचा कचरा गेमप्लॅन !



## पैसा जनतेच्या कराचा, कचऱ्यातून समृद्धी कोणाची ?



**अकोला:** शहरातील घराघरांच्या उंबरठ्यापासून ते थेट डंपिंग ग्राऊंडपर्यंतच्या कचरा व्यवस्थापनासाठी महापालिकेत सध्या कोट्यवधींच्या नव्या निविदेची (टेंडर) जोरदार चर्चा सुरू आहे. संपूर्ण शहराचा कचरा उचलण्याचे कंत्राट एकाच बड्या एजन्सीला देण्यासाठी प्रशासकीय पातळीवर हालचालींना कमालीचा वेग आला आहे. 'कचऱ्यातून समृद्धीकडे' असे गोंडस नाव या प्रकल्पाला दिले जात असले, तरी 'या समृद्धीच्या नावाखाली नेमका कोणाचा विकास साधला जात आहे?' असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. अकोलेकरांच्या करांवर हा दरोडा तर ठरणार नाही ना अशी विचारणा होत आहे.

नवीन 'सिंगल एजन्सी' पॅटर्न लागू झाल्यास या जुन्या आणि सध्या सुरू असलेल्या ठेक्यांचे काय होणार? ते थेट रद्द केले जाणार की त्यांना मुदतवाढ मिळणार, याबाबत प्रशासनाने अद्याप कोणतीही स्पष्ट भूमिका घेतलेली नाही. शहराच्या गल्लीबोळातून कचरा गोळा करणाऱ्या घंटागाड्या आणि कचरा डंपिंग ग्राऊंडपर्यंत वाहून नेणारे ट्रॅक्टर ठेकेदार हे स्थानिक आहेत. या व्यवसायावर शेकडो स्थानिक मजूर आणि लहान कंत्राटदारांचे कुटुंब अवलंबून आहे. एकाच मोठ्या बाहेरील एजन्सीला संपूर्ण शहराचे काम दिल्यास, या स्थानिक घंटागाडी आणि ट्रॅक्टर ठेकेदारांना घरचा रस्ता दाखवला जाईल का ?. अशी विचारणा होत आहे. शहराचा कचरा साफ करणे हा महापालिकेचा मुख्य हेतू आहे की, कचऱ्याच्या नावाखाली स्वतःच्या मर्जीतील ठेकेदारांचे खिसे भरणे हा अजेंडा आहे? जर हा प्रकल्प खरोखरच शहराच्या हिताचा असेल, तर प्रशासनाने स्थानिक ठेकेदारांचे पुनर्वसन आणि मनपा कर्मचाऱ्यांचा वापर यावर अधिकृत खुलासा करावा, अन्यथा अकोलेकर या 'कचरा कोंडी' विरोधात आवाज उठवल्याशिवाय राहणार नाहीत.

### 'पडीक वॉर्ड' संकल्पनेचा पुरता बोजवारा!

शहरातील काही वॉर्डांमध्ये कचऱ्याचे ढीग साचून राहतात, ज्याला 'पडीक वॉर्ड' म्हणून संबोधले जाते. नवीन एजन्सी आल्यानंतर या पडीक वॉर्डांची समस्या सुटणार की केवळ कागदोपत्रीच स्वच्छता दाखवून कोट्यवधींची बिले उचलली जाणार? जर एकाच एजन्सीला मक्तेदारी दिली, तर त्यांच्यावर वॉर्ड पातळीवर नियंत्रण ठेवणे महापालिकेला शक्य होईल का, अशी शंका उपस्थित केली जात आहे.

### महापालिकेची यंत्र सामग्री दान करणार का

महापालिकेकडे स्वतःची स्वच्छता कर्मचाऱ्यांची मोठी फौज आहे. कायमस्वरूपी, पडीक वार्डाचे कंत्राटी आणि ट्रक्टरवरील व इतर रस्ते साफ सफाई व मानधनावरील इतके कर्मचारी उपलब्ध असताना, पुन्हा खाजगीकरणाचा घाट घालून 'सिंगल ठेका पद्धतीने' कोट्यवधी रुपये मोजण्याची गरज काय ? जनतेच्या कराच्या पैशांची उधळपट्टी होते, हा आजवरचा अनुभव आहे. मग तरीही हा हट्ट कोणासाठी? सूत्रांच्या माहितीनुसार, या कोट्यवधींच्या टेंडरच्या अटी आणि शर्ती अशा प्रकारे तयार केल्या जात आहेत, जेणेकरून कोणतीतरी एकच 'ठरलेली' मोठी एजन्सी यामध्ये पात्र ठरेल. विकेंद्रीकरण करण्याऐवजी सर्व अधिकार आणि पैसा एकाच हातात सोपवण्याच्या या 'सेंट्रलाइज्ड' हालचालींमागे मोठे आर्थिक हितसंबंध गुंतल्याची चर्चा आता महापालिकेच्या वर्तुळात रंगू लागली आहे. संबंधित ठेकेदाराला महापालिकेची यंत्र सामग्री, वाहने हे दान दिली जातील काय अशी विचारणा होऊ लागली आहे.

# कोकणात पावसाची दमदार एन्ट्री !




प्रतिनिधी ९ जून

**मुंबई :** कोकणातील अनेक भागात पावसाने चांगली सुरुवात करत दमदार सलामी दिली. रत्नागिरी शहरासह जिल्ह्यातल्या अनेक भागात काल दुपारनंतर सुरू झालेला पाऊस चांगलाच बरसतोय. हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी, तर कधी जोरदार बॅटिंग असं स्वरूप पावसाचं आहे. त्यामुळे शेतकरी वर्गासह जिल्हावासीयांमध्ये समाधान आहे. उकाड्यापासून देखील नागरिकांना दिलासा मिळालाय. काल मृग नक्षत्राची सुरुवात झाली आणि त्याच दिवसापासून पावसानं हजेरी लावली. त्यामुळे शेतकरी देखील आता शेतीच्या कामाना सुरुवात करेल.

कोकणानंतर आता मान्सून मुंबईच्या दिशने सरकरला आहे. आज मुंबईत पाऊस बरसण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. महाराष्ट्रात आज (९ जून) वादळी वाऱ्यासह मुसळधार ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम, मुंबई, पुणे आणि नाशिकसह राज्यातील जवळपास २५ ते ३० जिल्ह्यांना पावसाचा 'यलो अलर्ट' जारी केला आहे. मुंबई, ठाणे, पालघर आणि दक्षिण कोकणातील सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह चांगल्या पावसाची शक्यता आहे.

### १२ ते १९ जूनच्या दरम्यान मान्सूनने मराठवाडा व्यापणार

महाराष्ट्रातील काही भागांमध्ये मान्सून सक्रिय झाला असला तरी मराठवाड्यात यंदा मान्सूनचे आगमन उशिराने होण्याची शक्यता असल्याचा अंदाज परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या हवामानशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. कैलास डाखोरे यांनी व्यक्त केला आहे. १२ ते १८ जून दरम्यान मान्सून मराठवाड्यात दाखल होऊन संपूर्ण विभाग व्यापण्यास पोषक परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

### राज्यात सर्वत्र समाधानकारक पावसाची शक्यता कमी

मान्सून दक्षिण कोकणात दाखल झाला असून सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांतील काही भागांमध्ये ९ जूनपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. मात्र त्यानंतर किमान १५ जूनपर्यंत राज्यातील पावसाचा एकंदरीत जोर तसेच मान्सूनच्या प्रगतीचा वेग कमी होण्याची शक्यता हवामानाच्या सध्याच्या अंदाजातून दिसून येत आहे. त्यामुळे या कालावधीत राज्यात सर्वत्र समाधानकारक पावसाची शक्यता कमी आहे. किमान १२ जूनपर्यंत राज्यातील अनेक भागांमध्ये कमाल तापमान सध्याप्रमाणेच उच्च राहण्याची शक्यता आहे. विदर्भ व खानदेशात कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक, तर मराठवाड्यात ३५ ते ४० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याचा अंदाज आहे.

# ओपन स्पेस घोटाळा लपविण्याची तयारी सुरु

## निवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यांना कामावर घेण्याच्या हालचाली

प्रतिनिधी ९ जून

**अकोला:** महापालिकेतील ओपन स्पेस घोटाळ्याची फाईल आर आर सी न्यूज आणि सिटी न्यूज सुपरफास्टच्या हाती कशी लागली याची चौकशी महापालिकेत सुरु झाली आहे. तर हा कोट्यावधीचा ओपन स्पेस घोटाळा दाबण्यासाठी थेट निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्याची रणनिती आखली जात असल्याची धक्कादायक माहिती मिळाली आहे.

महापालिकेत ५० ओपन स्पेस गायब असून हा केवळ ओपन स्पेस गायब असण्याचा घोटाळा नाही तर त्या ओपन स्पेस कोट्यावधीला विकल्याचा महाघोटाळा आहे. या घोटाळ्याच्या चौकशीसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी विशेष चौकशी समिती नेमण्याची गरज आहे. इतकेच नाही तर पन्नास ओपन स्पेस गायब आणि १३० ओपन स्पेसचे नकाशे गायब ची फाईल आर आर सी च्या हातात कशी लागली याचा शोध महापालिकेत घेतला जात आहे. इतक्यावर महापालिकेतील सत्तारुढ थांबले नसून आता ओपन स्पेस घोटाळ्याची व्याप्ती वाढू नये यासाठी थेट निवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यांना पुन्हा नियुक्त करण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहे. त्याची स्वतंत्र नोटशीट चालविली जात आहे. ओपन स्पेस घोटाळा लपविण्यासाठी निवृत्त होणाऱ्या काही अधिकाऱ्यांना पुन्हा महापालिकेत नोकरी देण्याची तयारी सुरु झाल्याची धक्कादायक माहिती मिळाली आहे. यावरुनच या घोटाळ्याची व्याप्ती समोर आली आहे. या विषयावर देखील महापालिका प्रशासन आणि पदाधिकारी यांची चुप्पी का असा प्रश्न उपस्थित होतो. महापालिका आयुक्त, महापौर यांनी या ओपन स्पेस व इतर घोटाळ्यावर पत्रकार परिषद घेत खुलासा करण्याची गरज अकोलेकर व्यक्त करत आहे.


महापालिका हद्दीत 'ओपन स्पेस' चा घोटाळा
50 ओपन स्पेस सापडेना, 130 ओपन स्पेसचे नकाशे गायब

# साखरपुड्याला जाताना कारची एसटीला धडक; सहा जण ठार

प्रतिनिधी ९ जून

**जळगाव :** जळगाव जिल्ह्यात अमळनेर-धुळे महामार्गावर मंगळवारी सकाळी तिहेरी अपघात झाला. या भीषण अपघातात सहा जणांचा जागीच मृत्यू झाला असून काही जण जखमी झाले आहेत. कार, एसटी बस आणि दुचाकी यांच्यात झालेल्या या अपघातामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. मृतांमध्ये साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी प्रवास करणाऱ्या गुजरात राज्यातील व्यारा येथील कुटुंबातील सदस्यांचा समावेश असल्याची माहिती आहे.

मंगरूळ गावाजवळ मंगळवारी सकाळी साधारण सात वाजण्याच्या सुमारास हा भीषण अपघात घडला. प्राथमिक माहितीनुसार, अमळनेरहून धुळ्याकडे जाणारी एसटी बस आणि दुचाकी आपल्या मार्गावरुन प्रवास करत असताना धुळ्याकडून भरधाव वेगाने



येणाऱ्या कारने नियंत्रण गमावले आणि समोरून जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी प्रचंड होती की दुचाकीचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला, तर कारमधील पाच प्रवाशांचाही घटनास्थळी मृत्यू झाला. त्यामुळे मृतांचा आकडा सहावर पोहोचला आहे. अपघातग्रस्त कारमधील प्रवासी गुजरात राज्यातील व्यारा येथील रहिवासी असल्याची माहिती मिळाली असून ते एका कौटुंबिक साखरपुडा समारंभासाठी अमळनेरकडे येत होते. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतकार्य सुरू केले.

# राम मंदिराच्या दानपेटीतून ५ कोटींची चोरी

**मुंबई:** अयोध्येतील राम मंदिराच्या दानपेटीतून तब्बल पाच कोटी रुपये चोरीला गेल्याचा गंभीर आरोप शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना राऊत यांनी केंद्र सरकार आणि भारतीय जनता पक्षावर निशाणा साधत, देशातील महत्त्वाच्या संस्थांवर आणि धार्मिक स्थळांच्या व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राम मंदिरासारख्या श्रद्धास्थानातही आर्थिक गैरव्यवहार होत असल्याचा दावा करत त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली.




# राष्ट्रपतींच्या हस्ते अकोल्याच्या शहीद जवानाला मरणोत्तर 'कीर्ती चक्र'

## मोरगाव भाकरेच्या प्रवीण जंजाळच्या पत्नी व आईने स्वीकारला सन्मान

प्रतिनिधी ९ जून

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यातील मोरगाव भाकरे येथील रहिवासी तथा महार रेजिमेंटच्या पहिल्या बटालियन, राष्ट्रीय रायफल्सचे शिपाई प्रवीण प्रभाकर जंजाळ यांना काश्मीर खोऱ्यात दहशतवाद्यांविरुद्ध लढताना दाखविलेल्या अद्वितीय शौर्य आणि सर्वोच्च बलिदानाबद्दल मरणोत्तर 'कीर्ती चक्र' प्रदान करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रपती भवनात आयोजित विशेष 'रक्षा अलंकरण' सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला. शहीद जवान प्रवीण जंजाळ यांच्या वतीने त्यांच्या पत्नी श्यामबाला जंजाळ आणि आई शाहू प्रभाकर जंजाळ यांनी राष्ट्रपतींच्या हस्ते हा प्रतिष्ठेचा पुरस्कार स्वीकारला.



या सोहळ्यास उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह तसेच अन्य केंद्रीय मंत्री, वरिष्ठ लष्करी अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते. शहीद प्रवीण जंजाळ यांच्या अतुलनीय शौर्य, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रसेवेसाठीच्या सर्वोच्च बलिदानाचा गौरव म्हणून भारत सरकारने त्यांना मरणोत्तर 'कीर्ती चक्र' जाहीर केले होते. या बहुमानामुळे अकोल्याच्या लौकिकात आणखी भर पडली आहे. अकोला जिल्हा देशसेवेतही अव्वल असल्याचे यावरून दिसून येत आहे.

### मातृभूमीच्या रक्षणासाठी प्रवीण जंजाळ शेवटच्या श्वासापर्यंत लढले!

६ जुलै २०२४ रोजी काश्मीर खोऱ्यात सुरू असलेल्या शोध मोहिमेदरम्यान शिपाई प्रवीण जंजाळ आपल्या तुकडीसह कार्यरत होते. मोहिमेदरम्यान काही संशयास्पद हालचाली निदर्शनास येताच त्यांनी तातडीने आपल्या सहकाऱ्यांना सतर्क केले. याचवेळी लपून बसलेल्या दहशतवाद्यांनी पळून जाण्याच्या उद्देशाने अंधाधुंद गोळीबार सुरू केला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही शिपाई जंजाळ यांनी विलक्षण धैर्य, शौर्य आणि प्रसंगावधान दाखवत दहशतवाद्यांचा पाठलाग केला. स्वतःच्या अचूक गोळीबारातून त्यांनी दोन कुख्यात दहशतवाद्यांचा खात्मा केला. चकमकीदरम्यान त्यांच्या डोक्याला गोळी लागून ते गंभीर जखमी झाले होते. मात्र, गंभीर जखमी अवस्थेतही त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत लढा सुरू ठेवला आणि अखेर मातृभूमीच्या रक्षणासाठी वीरमरण पत्करले.

# स्टॉप डायरिया अभियान

## अभियान १६ जून ते ३१ जुलै राबविण्यात येणार

डायरिया (जुलाब) हा लहान मुलांमध्ये आणि बालकांमध्ये आढळणारा एक गंभीर आजार आहे. विशेषतः पावसाळ्यात दूषित पाणी, अस्वच्छता आणि अपुरी स्वच्छता यांमुळे डायरियाचे प्रमाण वाढते. या आजारामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन निर्जलीकरण होऊ शकते, जे जीवघेणे ठरू शकते. त्यामुळे भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने अंतर्गत 'स्टॉप डायरिया अभियान' सुरू केले आहे. हे अभियान १६ जुन ते ३१ जुलै राबविण्यात येणार आहे या अभियानाच्या अनुषंगाने एक जून ते १५ जून या कालावधी अभियानाची तयारी करण्यात येत आहे यामध्ये कर्मचारी प्रशिक्षण औषध साठा उपलब्धता सर्वेक्षण प्रती आराखडा लाभार्थी लाईन लिस्ट विशेष मोठ्या प्रमाणावर जनजागृती यामध्ये माहिती नागरिकांना कोण्याकरिता सर्व माध्यमातून मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात येणार आहे सोशल मीडियाचा वापर करून लोकांना माहिती दिली जाणार आहे शाळा विविध संस्था इतर विभागातील अधिकारी कर्मचारी यांचे माध्यमातून प्रसिद्ध करण्यात येणार आहे या अभियानाचा मुख्य उद्देश पाच वर्षांखालील मुलांमधील डायरियामुळे होणारे मृत्यू




शून्यावर आणणे हा आहे.

'स्वच्छता, सुरक्षित पाणी आणि ओआरएस' हे डायरियाविरुद्धचे प्रभावी शस्त्र आहे. प्रत्येक नागरिकाने स्वच्छतेचे नियम पाळून आणि डायरियाबाबत जागरूक राहून या अभियानाला यशस्वी बनवावे. निरोगी बालक हेच देशाचे उज्ज्वल भविष्य आहे; म्हणूनच ङङ'डायरिया रोखा, आरोग्य जपा'ङङ हा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. डॉक्टर विनोद करंजेकर जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी जिल्हा परिषद अकोला

**अभियानाचे महत्त्व**

डायरिया हा टाळता येण्याजोगा आजार आहे. योग्य वेळी उपचार, स्वच्छता आणि जनजागृती यामुळे हजारो बालकांचे प्राण वाचू शकतात. स्टॉप डायरिया अभियानामुळे ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होत आहे आणि स्वच्छ भारताच्या उद्दिष्टालाही बळकटी मिळत आहे.

**अभियानाची उद्दिष्टे**

स्टॉप डायरिया अभियानांतर्गत खालील बाबींवर विशेष भर दिला जातो

१. ओआरएस आणि झिंकचा वापर वाढविणे.
२. स्वच्छ पाणी, हात धुण्याची सवय आणि स्वच्छता यांचा प्रसार करणे.
३. डायरियाची लक्षणे, उपचार आणि प्रतिबंध याबाबत जनजागृती करणे.
४. ङआरोग्य सेवांची गुणवत्ता आणि उपलब्धता वाढविणे.

डायरियापासून बचावाचे उपाय
नेहमी स्वच्छ आणि उकळलेले पाणी पिणे.
जेवणापूर्वी आणि शौचालय वापरल्यानंतर साबणाने हात धुणे.
अन्न झाकून ठेवणे व ताजे अन्न सेवन करणे.
बालकांना स्तनपान देणे.
लसीकरण वेळेवर करून घेणे.
डायरिया झाल्यास त्वरित ओआरएस आणि झिंकचा वापर करणे.

# जगभरातील महासागरांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस

जागतिक महासागर दिन जगभर ८ जून रोजी पाळला जातो. २००८ सालापासून संयुक्त राष्ट्रांनी हा दिवस अधिकृतरीत्या पाळण्याचे ठरविले. त्यापूर्वी १९८२ सालापासून कॅनडामध्ये तो साजरा होत असे. कॅनडा स्थित आंतरराष्ट्रीय संस्था महासागरांच्या संरक्षणासाठी कार्यरत आहे, या संस्थेच्या पुढाकाराने सर्वप्रथम या दिवसाची सुरुवात झाली. वर्ल्ड ओशन नेटवर्क सारख्या विविध संस्था, मत्सयालये, प्राणिशास्त्र विषयात काम करीत असलेल्या संस्था; अशा महत्त्वाच्या संस्था यासाठी एकत्रितपणे योगदान देतात.

जगभरातील महासागरांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा दिवस वार्षिक स्वरूपात साजरा केला जातो. महासागर हे संरक्षिले जावेत आणि नैसर्गिकदृष्ट्या असलेले त्यांचे महत्व जपले जावे, असा यामागे हेतू आहे. प्राणवायू, वातावरणाचे नियमन, अन्नाचा पुरवठा, औषधे आणि अन्य बाबींसाठी महासागरांचे स्थान महत्त्वाचे आहे. या निमित्ताने व्यक्तिगत आणि सामूहिक पातळीवर महासागर रक्षणाची संधी घेतली जाते. महासागर प्रकल्प आणि जागतिक महासागर नेटवर्कने प्रथमच वार्षिक थीम लाँच केली: 'आमच्या हवामानास मदत करणे / आमच्या महासागराला मदत करणे' कोरल रीफवर विशेष लक्ष केंद्रित करून, आंतरराष्ट्रीय रीफ वर्षासाठी मदत करण्यासाठी. 'एक महासागर, एक हवामान, एक भविष्य' या संवर्धन कृती थीमसह हवामानावर सतत आणि अधिक जोर देते कारण व्यापक मतदान कार्याने असे दिसून आले आहे की लोक हवामान बदल आणि महासागर आरोग्य यांच्यातील संबंध जोडत नाहीत. महासागर प्रकल्प आणि जागतिक महासागर नेटवर्कने डब्ल्यूओडी २०१० साठी ३०० हून अधिक घटनांची नोंद केली, २००९ च्या तुलनेत २६ टक्के वाढ. युनायटेड स्टेट्समधील सहभाग ३२ टक्क्यांनी वाढला (मागील वर्षी २५ राज्यांच्या तुलनेत ३७ राज्यांमधील सहभागासह). बांगलादेश, बेल्जियम, फ्रेंच पॉलिनेशिया, नायजेरिया, घाना, केन्या, माल्टा, मलेशिया, व्हेनेझुएला आणि पोर्तुगाल यासह ४५ देशांनी जागतिक महासागर दिन २०१० मध्ये भाग



घेतला. दोन वर्षांच्या फोकससाठी जगभरातील वाढत्या विनंत्यांच्या आधारे, द ओशन प्रोजेक्ट आणि वर्ल्ड ओशन नेटवर्कने 'युथ: द नेक्स्ट वेव्ह फॉर चेंज' लाँच केले आणि सर्व सहभागी संस्थांना त्यांच्या समुदायांमध्ये आणि देशांमधील तरुणांना शिक्षणासाठी अधिक प्रभावीपणे गुंतवून ठेवण्यासाठी प्रोत्साहित केले. 'मेक अ प्रॉमिस' जागतिक मोहिमेने जागतिक महासागर दिन कार्यक्रमांचा वापर त्यांच्या समुदायातील लोकांना किंवा आमच्या सामायिक महासागरासाठी कृती करण्यासाठी लक्ष्यित प्रेक्षकांना विचारण्याची संधी म्हणून मदत करणाऱ्या संस्थांवर पुन्हा लक्ष केंद्रित केले.

जागतिक जागतिक महासागर दिवस नेटवर्कद्वारे, महासागराला भेडसावणाऱ्या प्रमुख समस्यांवर सहभाग वाढवला आणि 'टूगेदर व्हॅव द प्रोटेक्ट द ओशन!' लाँच केले. अक्षय ऊर्जा/हवामान बदल, शाश्वत सीफूड/मत्स्यपालन, प्लास्टिक कृती यावरील कृती मार्गदर्शकांसह. जागतिक महासागर दिनाच्या वेबसाइटवर नोंदणीकृत इव्हेंटची संख्या शेकडो आहे. संयुक्त राष्ट्रांनी भागीदारांसह वार्षिक हौशी जागतिक महासागर दिवस महासागर छायाचित्र स्पर्धा सुरू केली.

वार्षिक यूएन थीमशी एकरूपतेसाठी, द ओशन प्रोजेक्टने प्लास्टिक प्रदूषण प्रतिबंध आणि निरोगी जागतिक महासागरासाठी उपायांसाठी मदत करण्यावर पाच वर्षांचा संवर्धन कृती फोकस सुरू केला. जागतिक महासागर दिवस युवा सल्लागार परिषद २०१६ मध्ये सुरू झाली आणि सध्याच्या गटात २२ देशांतील २५ विविध तरुण नेत्यांचा (१५-२३ वयोगटातील) समावेश आहे. २०१६ पासूनचे वार्षिक अहवाल येथे पाहिले जाऊ शकतात.

जागतिक महासागर दिनाची यूएन थीम 'शाश्वत महासागरासाठी नवकल्पना' होती. संवर्धन कृती २०३० (३० बाय ३०) पर्यंत आपल्या ३० टक्के भूमी आणि महासागरांचे संरक्षण करण्यावर लक्ष केंद्रित करा, निसर्गाच्या मोहिमेमध्ये सामील व्हा आणि जागतिक नेत्यांना त्यांच्या देशांना ३० बाय ३० करण्यासाठी वचनबद्ध करण्यासाठी विनंती करण्यासाठी वाढत्या जागतिक चळवळीत सामील व्हा. महासागर प्रकल्प आणि नॅशनल जिओग्राफिकने महासागरासाठी प्रथमच २४-तासांच्या युथ-अ-थॉनचे समन्वय साधले, २४ प्रमुख टाइम झोनमधील २४ सह-यजमानांनी आमच्या सामायिक निळ्या ग्रहाबद्दल अधिक जाणून घेण्याच्या आणि संरक्षित करण्यात मदत करण्याच्या पद्धतींवर चर्चा आणि प्रात्यक्षिक केले. जागतिक महासागर दिवस २०२० चा वार्षिक अहवाल येथे पाहता येईल.

२०२१ मधील जागतिक महासागर दिनाची थीम 'द ओशन: लाईफ अँड लिव्हलीहुड्स' आहे. या वर्षीच्या मोहिमेचे उद्दिष्ट 'महासागराच्या आश्चर्यावर प्रकाश टाकणे आणि ते आपले जीवनस्रोत कसे आहे, मानवतेला आणि पृथ्वीवरील इतर सर्व जीवांना आधार देणे' हे आहे. जागतिक महासागर दिन २०२१ साठी संवर्धन कृती फोकस २०३०पर्यंत आपल्या ३० टक्के भूमी आणि महासागरांचे संरक्षण करण्यावर दुसऱ्या वर्षासाठी लक्ष केंद्रित केले आहे, निसर्गासाठी मोहीम आणि जागतिक नेत्यांना त्यांच्या देशांना वचनबद्ध करण्यासाठी विनंती करण्यासाठी वाढत्या जागतिक चळवळीमध्ये सामील होणे. ३० बाय ३० पर्यंत. वेबसाइटवर १५० देशांमधील १,००० हून अधिक कार्यक्रमांची नोंदणी झाली होती. २०२२ मधील जागतिक महासागर दिनाची थीम 'पुनरुज्जीवन: महासागरासाठी सामूहिक कृती' आहे. हा दिवस जगभरातील शाश्वत विकास उद्दिष्टांच्या अंमलबजावणीस समर्थन देतो आणि महासागरांचे संरक्षण व त्यांच्या संसाधनांच्या शाश्वत व्यवस्थापनामध्ये लोकांची आवड वाढवतो. जागतिक महासागर दिन संयुक्त राष्ट्रांचे सर्व सदस्य देश साजरा करतात.

# सूर्यावरील प्रचंड स्फोटाचा पृथ्वीला तडाखा !

## भारतात 'ऑरोरा दिसण्याची शक्यता, नासाकडून सतर्कतेचा इशारा

*नवी दिल्ली : एका प्रचंड सौर उद्रेकातून वेगाने पसरणारा कोरोनल मास इजेक्शन पृथ्वीच्या दिशेने येत असून हे कोरोनल मास इजेक्शन आज पृथ्वीवर पोहोचत आहे. परिणामी नासाने जी ३ भूचुंबकीय वादळाचा इशारा दिला असून, उत्तर भारत, युरोप आणि ऑस्ट्रेलियामध्ये अरोरा दिसण्याची शक्यताही वर्तवली आहे. नासाने दिलेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसापासून सूर्य आठवडाभर अस्वस्थ होता. तो भडकत होता, उद्रेक करत होता आणि एकामागून एक चुंबकीय वायूचे ढग सौरमंडळात वेगाने पाठवत होता, जणू काही एखादे शहर न थांबणारे फटाके फोडत आहे, अशी परिस्थिती होती.*

त्यापैकी काही चुंबकीय वायूचे ढग पृथ्वीच्या चुंबकगोलाला चाटून गेलेत. ६ जून, २०२६ च्या सकाळी, हि प्रक्रिया थांबली. 'सक्रिय प्रदेश ४४६१' नावाच्या सौर पृष्ठभागाच्या एका भागातून एक स्फोट झाला, ज्याचे वर्गीकरण एम १.८ फ्लेअर म्हणून केले जाते, जे सौर फ्लेअरच्या मापनश्रेणीत मध्यम श्रेणीत येते. सौर फ्लेअर म्हणजे सूर्याच्या पृष्ठभागावरून होणारा किरणोत्सर्गाचा एक अचानक, तीव्र स्फोट, जो चुंबकीय ऊर्जेच्या स्फोटक उत्सर्जनामुळे होतो. आणि या फ्लेअरने जी गोष्ट सोबत आणली होती, त्यामुळे अंतराळ हवामानशास्त्रज्ञांना दोनदा पाहावे लागले.

दरम्यान, एक गाभ्याचा तंतु, जो घन, चुंबकीय



आणि वेगवान होता. आणि थेट पृथ्वीच्या दिशेने येत होता. तो तंतु आता प्रति सेकंद सुमारे १,४०० किलोमीटर वेगाने सौरमंडळाच्या आतील भागातून जात आहे. तो आज पृथ्वीवर पोहोचण्याची शक्यता आहे. स्पेस वेदर प्रेडिक्शन सेंटर, जी अमेरिकेची सूर्यावर चोवीस तास लक्ष ठेवणारी संस्था आहे, तिने जी ३ म्हणजेच तीव्र भूचुंबकीय वादळासाठी सूचना जारी केली आहे.

**फिलामेंट म्हणजे काय?**

विज्ञानापूर्वी, एका प्रतिमेची कल्पना करा. अशा पुलाची कल्पना करा जो पोलाद किंवा दगडाचा नाही, तर विजेचा बनलेला आहे. ते कशावरही तरंगत नाही, पूर्णपणे अदृश्य चुंबकीय क्षेत्रांच्या आधाराने तोलले जाते, आणि त्याच्या आत वायूची एक नदी वाहते, जी सभोवतालच्या वातावरणाच्या मानाने विलक्षण थंड आणि विलक्षण घन आहे. यालाच फिलामेंट म्हणतात. सूर्याचे बाह्य वातावरण, ज्याला कोरोना म्हणतात, ते प्रचंड अदृश्य चुंबकीय क्षेत्रांनी विणलेले आहे, जी सूर्याच्या पृष्ठभागापासून वलयांच्या रूपात बाहेर पसरलेली आहेत. ही क्षेत्रे आयनीकृत वायू असलेल्या घन प्लाझ्माला एका तरंगत्या रचनेत अडकवू शकतात, जी कोणत्याही सहज तर्काने जागेवर स्थिर राहू शकत नाही. आणि काही काळासाठी ती स्थिर राहते.

**भूचुंबकीय वादळ म्हणजे काय? :** भूचुंबकीय वादळ म्हणजे पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्रात होणारा एक तात्पुरता व्यत्यय, जो मॅग्नेटोस्फियरवर सौर ऊर्जेचा प्रचंड प्रवाह आदळल्यामुळे होतो. या संदर्भात नासा सतर्क असून अरोराचे छायाचित्रकार आधीच आपले अलार्म लावत आहेत. अरोरा, जे उत्तर ध्रुवीय प्रकाश म्हणून लोकप्रिय आहेत, हे हिरव्या, जांभळ्या आणि लाल प्रकाशाचे पडदे आहेत जे पृथ्वीच्या वरच्या वातावरणातील वायूंवर सौर ऊर्जेचे चार्ज केलेले कण आदळल्यावर रात्रीच्या आकाशात लहरींप्रमाणे पसरतात. अगदी शब्दशः सांगायचे तर, ते सूर्याच्या क्रोधाचे सुंदर रूप आहे.

# मोफत नेत्र तपासणी शिबिराचा १६७ रुग्णांनी घेतला लाभ

प्रतिनिधी ९ जून

**हिवरखेड :** स्व. रमेश विठ्ठलराव गावंडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित मोफत नेत्र तपासणी शिबिरामध्ये १६७ रुग्णांनी सहभाग नोंदवला.

आधुनिक संगणकीय मशीनद्वारे आयोजित या शिबिरात नेत्रतज्ज्ञ डॉ. मुख्तार खान यांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक सल्ला व मार्गदर्शन केले. तसेच गरजू नागरिकांसाठी अल्पदरात चष्म्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. हिवरखेड शहरासह परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला.



ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा त्यांच्या दारात उपलब्ध करून देण्याचा हा प्रयत्न कौतुकास्पद ठरत असून, अनेक ज्येष्ठ नागरिक व गरजू रुग्णांना या शिबिराचा मोठा फायदा झाला. या समाजोपयोगी उपक्रमाचे आयोजन श्री. अनिल भाऊ गावंडे व श्री रमेश भाऊ दुतोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली व वैभव रमेश गावंडे (बांधकाम सभापती, नगरपरिषद हिवरखेड) यांच्या पुढाकारातून करण्यात आले. यावेळी अनिल भाऊ गावंडे, संदीप भाऊ इंगळे, रामदास गावंडे तसेच डॉ. दीपक गावंडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी अशा सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करत आयोजकांचे कौतुक केले.

महाराष्ट्र शासन
**सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला**
**ई-निविदा सूचना ०५/२०२६-२०२७**
**जावक क्रमांक 3488/ईनिसु-०५/ निलि /२०२६ / दिनांक 02/06/2026**
email.akola.ee@mahapwd.gov.in Phone No ०७२४- २४३५१९५

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला या महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील काम क्र. १ ते १५ निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन मागविण्यात येत आहे)** निविदेतील अटी व शर्ती यांची पूर्तता करतील, असे सक्षम कंत्राटदार तसेच काम क्र. १ करीता आंतरराष्ट्रीय कंपनी यांची उप कंपनी भारतीय असल्यास निविदा स्पर्धेमध्ये भाग घेऊ शकतील. कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे अटी व शर्तीच्या अधीन राहून निविदेमध्ये सहभाग नोंदवू शकतील. **ई-निविदा संकेतस्थळ https://www.mahatenders.gov.in** येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची किंमत (रुपये) | संवर्ग |
|---|---|---|---|
| १ | क्रिडा संकुल अकोला येथे ऑलिम्पिक दर्जाचे जलतरण तलाव परिसरात प्रेक्षकांसाठी गॅलरी, पार्कींग आणि सिमेंट रस्ता बांधकाम करणे | २९०६७९५५ | पात्र |
| २ | अकोला जिल्ह्यातील तालुका बाळापूर येथे न्यायालयीन इमारती मध्ये लॉयर्स हॉलचे बांधकाम करणे | १०८५५४९९ | पात्र |
| ३ | अकोला येथे वन भवन इमारतीला आवारभितीचे बांधकाम व डांबरी रस्ता तयार करणे | ७६४३९२७ | पात्र |
| ४ | अकोला येथे वन विभाग कार्यालय परिसरात इन्सपेक्ट हटचे बांधकाम करणे | ७१२००८० | पात्र |
| ५ | अकोला जिल्ह्यातील अंबाशी गावाजवळ प्रजिमा-२२ चे मजबुतीकरण करणे ता. पातूर व मलकापूर गावाजवळ प्रजिमा- २२ चे मजबुतीकरण करणे ता. पातूर | ३९३६१८४ | पात्र |
| ६ | अकोला येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे शासकीय निवासस्थानाच्या जवळ अस्थमा व क्ष किरण वॉर्डाला आवारभिंतीचे बांधकाम करणे | २३३६८४७ | पात्र |
| ७ | अकोला जिल्ह्यातील राजंदा येथे ग्रामपंचायत जागेत सभागृह बांधणे ता. बार्शिटाकळी | १२३५०२६ | पात्र |
| ८ | अकोला जिल्ह्यातील मांगुळ येथे दत्त मंदीरा जवळ ग्रामपंचायत जागेत सभागृह बांधणे ता. बार्शिटाकळी | १२३५०२५ | पात्र |
| ९ | अकोला जिल्ह्यातील मौजे नवेगांव येथे सांस्कृतिक संकुलाचे बांधकाम करणे ता. पातूर. | ३५०४७३१ | सुबेअ |
| १० | अकोला जिल्ह्यातील जलालाबाद येथे गजानन महाराज मंदीरा जवळ ग्रामपंचायत जागेत सभामंडप बांधणे ता. बार्शिटाकळी | १६६४६०८ | सुबेअ |
| ११ | अकोला येथे सा.बां. विभाग विश्राम भवन सुट क्रमांक ५,६,७, व ८ चे नूतनीकरण करणे | ४१२२५५२ | मकाससं |
| १२ | अकोला येथे सैनिक मुलांचे वस्तीगृहाचे नुतनीकरण व बळकटीकरण करणे | ३९७२७२३ | मकाससं |
| १३ | अकोला येथे सैनिक मुलींचे वस्तीगृहाचे नुतनीकरण व बळकटीकरण करणे | ३८९०७४६ | मकाससं |
| १४ | अकोला येथे न्यायरत्न जिल्हा व सत्र न्यायाधिश निवासस्थानाची विशेष दुरुस्ती करणे | २६६१८९८ | मकाससं |
| १५ | अकोला जिल्ह्यातील वरणगाव येथे ग्रामपंचायत जागेत सभामंडप बांधणे ता. पातूर | १२३०९१४ | मकाससं |

**अटी व शर्ती -** १. सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदा डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
२. **ई-निविदा काम क्र. १ ते १५** कामांची ई - निविदा **दिनांक** ०९/०६/२०२६ रोजी १०.०० पासुन **दिनांक** १६.०६.२०२६ रोजी १८.०० वाजेपर्यंत डाऊनलोड व हॅश सबमीशन करता येतील. ई निविदा कामाची ई-निविदा उघडण्याची **दिनांक** १८.०६.२०२६ **( पुढील ई-निविदा विषयक कार्यक्रम ऑनलाईनप्रमाणे)**
३. **वरील काम क्र. १ कामाची निविदा पूर्व बैठक दिनांक १०/०६/२०२६ वेळ १२.०० वा. मा. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला येथे आयोजित करण्यात येईल.**
४. वरील **काम क्र. १ ते २** कामांची ई-निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला येथे उघडण्यात येतील.
४. खालील संकेत स्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध राहिल. http://mahatenders.gov.in
५. इतर अटी व शर्ती ई निविदा नमुन्यामध्ये उपलब्ध आहेत. कोणत्याही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न सांगता अस्विकृत करण्यांचे सर्व अधिकार सक्षम प्राधिकरणाकडे राखून ठेवण्यात आले आहे.
६. वरील कामांसाठी कंत्राटदाराने त्यांचे अभियंत्यासह मोक्याची जागेची पाहणी करून ई-निविदा सादर करावी व कोणतेही अतिरिक्त दावे स्वीकारल्या जाणार नाही.
७. ऑनलाईन वेळापत्रक लागू व अंतिम राहील.

**(प्रसाद पाटील)**
**कार्यकारी अभियंता**
**सा.बां. विभाग अकोला**

DGIPR-2026-27/1048

दिन विशेष

# वसंत देसाई : एक सर्जनशील संगीतकार



**आज जयंती**

वसंत देसाई यांचा जन्म ९ जून १०१२ मध्ये सोनावडे जि. सावंतवाडी येथे झाला. ते मराठी तसेच अन्य भारतीय चित्रपटांस संगीत देणारे मराठी संगीतकार होते. त्यांनी दिलेल्या चालींमुळे त्यांचे नाव भारतात आणि परदेशांत अजरामर झाले आहे.

घरात सांज-सकाळ होणाऱ्या आणि गाव देवळात होणाऱ्या भजन-कीर्तनांमुळे छोट्या वसंताला संगीतात रुची निर्माण झाली. त्यातच गावात एक सर्कस आली; ती पाहिल्यावर त्यांना सर्कशीत कामे करून लोकांना आनंद द्यावे असे वाटू लागले. त्यासाठी त्यांनी गाव सोडले व ते कोल्हापूरला आले. सर्कशीत काम मिळाले नाही पण प्रभात फिल्म कंपनीत नोकरी मिळाली. त्यावेळी अयोध्येचा राजा या चित्रपटाची निर्मिती होत होती; गोविंदराव टेंबे संगीत देत होते. वसंत देसाईंनी त्यांचा साहाय्यक होण्याचे पत्करले. पुढे कंपनी कोल्हापूरहून पुण्याला आल्यावर वसंत देसाईही पुण्यात आले आणि त्यांना मास्तर कृष्णराव व केशवराव भोळे या दोन दिग्गज संगीतकारांचा सहवास लाभला. तेथेच वसंतराव संगीतातले स्वर, तान, फिरकी, आणि रसानुकृत भावदर्शन शिकले.

इ.स. १९४३ मध्ये वसंत देसाई यांनी राजकमल कलामंदिराच्या शकुंतला या पहिल्या चित्रपटाला स्वतंत्रपणे संगीत दिले. त्यांची ही संगीत कारकीर्द पुढे तीस वर्षे चालूच राहिली. जवळजवळ ६५ हिंदी-मराठी चित्रपटांचे ते संगीत दिग्दर्शक होते. चित्रपट-नाटकांशिवाय त्यांनी बालगीतांना आणि समरगीतांनाही संगीत दिले. त्यांच्या 'ए मालिक तेरे बंदे हम' या गीताला पाकिस्तानात राष्ट्रगीताचा दर्जा मिळाला. १९६२ च्या चीन युद्धाच्या वेळचे 'जिंकू किंवा मरू' या ग.दि. माडगुळकरांच्या गीताला त्यांनीच चाल लावली होती.

हिंदी चित्रपट संगीतकारांचा विचार करताना, बरेचसे संगीतकार हिंदी चित्रपटांपुरते किंवा हिंदी भाषिक गीतांपुरते आपले अस्तित्व ठेवतात. अर्थात ही त्यांची मर्यादा असे म्हणता येणार नाही पण त्यांनी हिंदी चित्रपट हेच आपले ध्येय ठेवले. या मताला सणसणीत अपवाद म्हणून वसंत देसाई यांचे नाव अवश्यमेव घ्यावेच लागेल. कोकणपट्टीतील सावंतवाडी जवळील सोनवड गावी जन्म. हा तपशील जरा महत्वाचा म्हणायला लागेल कारण हा परिसर धर्म आणि लोकसंगीताने गाजणारा आहे. याचा प्रभाव आणि परिणाम वसंत देसाईंवर नक्कीच झाला असणार. संगीतात लहानपणापासून अतोनात रस, याची परिणीती, उस्ताद इनायत खान आणि डागर बंधू, यांच्याकडून शास्त्रोक्त संगीताची तालीम घेतली. वसंत देसाईंच्या स्वररचनेवर रागसंगीताचा फार प्रभाव आहे, याचे मूळ इथे सापडू शकते. पुढे तरुण वयात प्रभात कंपनीत, गोविंदराव टेबे यांच्या हातखिळी सहाय्यक म्हणून काम करण्याची संधी मिळाली आणि प्रभात कंपनीत स्थिरावले. इथे त्यांना व्ही. शांताराम भेटले आणि नंतर जेंव्हा व्ही. शांतारामांनी प्रभातपासून वेगळे व्हायचा निर्णय घेतला तेंव्हा वसंत देसाई यांना तिथे भरपूर संधी मिळाल्या. या दोघांना प्रभातचा वारसा मिळाला होता, हे मुद्दामहून ध्यानात ठेवावे लागेल. समान विचार आणि ध्येये यांचा परिणाम दोघांच्याही कार्यात दिसला. राजकमल बरोबर त्यांनी दीर्घकाळ काम केले. वास्तववादी चित्रपटनिर्मितीत ज्याचा उद्भव होतो त्या संगीतावरच भर असल्याकारणाने विविध आणि वास्तव ध्वनी-उगम वापरण्यावर देसाई यांचा कटाक्ष होता. उदाहरणार्थ, ' डॉ आँखे बारा हाथ' या चित्रपटातील 'सैय्या झुठो का बडा सरताज निकला' या गाण्यात 'रावणहथ्था' या लोकवाद्याचा समर्पक उपयोग!! तसेच याच चित्रपटातील 'ऐ मालिक तेरे बंदे हम' या गाण्यात योजलेला लयबंध वाऱ्याने उघडझाप करणाऱ्या खिडकीने पुरवला जातो. वसंत देसाईंच्या रचनांत थोडाफार नाट्यगीतांचा गंध राहिलापण हे थोडे अपेक्षित असेच म्हणावे लागेल. याशिवाय असे जाणवते, पारंपरिक सांगीत चलने आणि चाली यांच्या अंगभूत संगीत आकर्षणशक्तीवर विश्वास असल्या कारणाने त्या जशाच्या तशा व परिणामकारकतेने वापरण्यात त्यांनी मागेपुढे पहिले नाही. याचाही संबंध मराठी नाट्यसंगीताशी असलेल्या त्यांच्या जवळच्या नात्याचा असावा. हिंदुस्थानी कलासंगीताचा आपण यथातथ्य वापर करतो असा मराठी नाट्यसंगीतपरंपरेचा दावा बऱ्याच अंशी सार्थ असतो, हा दृष्टिकोन इथे महत्वाचा आहे. या परंपरेचा आणि देसाई यांचाही कलासंगीतास पातळ करून वापरण्यावर भरवसा नव्हता. 'झनक झनक पायल बाजे' या चित्रपटातील 'नैन सो नैन' या गाण्यासाठी 'मालगुंजी' रागाचा आधार घेतला आहे आणि हा राग प्रेम-प्रणय इत्यादींसाठी वारंवार वापरलेल्या बागेश्रीपासून नाजूक अंतर राखून असतो म्हणजे तास ठेवावा लागतो. याच चित्रपटातील, भारताच्या अनेक प्रांतांत प्रचलित 'बारमासा' या पारंपरिक लोकगीतप्रकारच्या धर्तीवर त्यांनी ऋतूवर्णनपर पद्यें योजली आहेत. या रचनांना गीतांचे स्वरूप न देता केवळ चाली ठेवण्यात देसाई यांनी परंपरेत राहून थोडा बदल करण्याच्या रचनापद्धतीचा अवलंब केला आहे.

३
सिटी न्यूज अकोला
मंगळवार, दि. ८ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

भागवत हा वेदरूपी कल्पवृक्ष

# निष्कपट भक्तीनेच होते ईश्वरप्राप्ती : पंडित सुदर्शनजी शर्मा

प्रतिनिधी ९ जून

**अकोला :** 'श्रीमद् भागवत हा केवळ एक ग्रंथ नसून तो प्रत्यक्ष वेदरूपी कल्पवृक्ष आहे. मानवाच्या सर्व इच्छा पूर्ण करण्याचे सामर्थ्य या कल्पवृक्षात आणि वेदांमधील मंत्रांमध्ये आहे. कलियुगात मानवाचे कल्याण व्हावे, याच परम पावन उद्देशाने शुकदेवांनी राजा परीक्षिताच्या माध्यमातून हे भागवतरूपी अमृत पृथ्वीवर आणले,' असे उद्गार सुप्रसिद्ध कथाव्यास पंडित सुदर्शनजी शर्मा यांनी काढले.

दत्त कॉलनीतील 'गोकुळ धाम' येथे आयोजित श्रीमद् भागवत कथा सप्ताहाच्या 'द्वितीय पुष्पा'त ते भाविकांना मार्गदर्शन करत होते. पवित्र पुरुषोत्तम मासाचे औचित्य साधून कै. पुंडलिकराव बंकटराव



गोकुळ धाममध्ये भागवत कथेचे 'द्वितीय पुष्प'; भाविक मंत्रमुग्ध, अकोल्यात भक्तीचा सागर उफाळला

उपाख्य अण्णासाहेब देशमुख यांच्या पवित्र स्मृतीप्रित्यर्थ देशमुख परिवाराने या ज्ञानयज्ञाचे आयोजन केले आहे. या भक्तीरसात न्हाऊन निघण्यासाठी अकोल्यातील भाविकांनी गोकुळ धाममध्ये प्रचंड गर्दी केली होती.

कथेचे मर्म सांगताना पंडितजी म्हणाले की, भागवत कथा ऐकण्याचा खरा अधिकारी कोण? ज्याच्या मनात कुठलाही कपटभाव नाही आणि जी व्यक्ती ईर्षेपासून दूर आहे, तीच व्यक्ती या अमृताची मानकरी ठरू शकते.'ईश्वर हा केवळ भावाचा भुकेला आहे. तुमच्या भक्तीमध्ये कोणताही व्यावहारिक हेतू किंवा स्वार्थ नसावा. देवाकडे काहीही मागू नका, कारण चराचरात वास करणाऱ्या त्या घटघटवासी ईश्वराला आपल्या मनातले सर्व काही आधीच ज्ञात आहे. जर आपण मागितले, तर तो व्यापार होईल, भक्ती नाही!'ईश्वराच्या सगुण-निर्गुण रूपाची फोड करताना त्यांनी सांगितले की, ईश्वर हा जन्माच्या पलीकडचा (अजन्मा) आहे. पण भक्तांच्या ओढीपोटी आणि इच्छेनुसार तो सगुण रूप धारण करतो.

आपले मन श्रीकृष्णाच्या चरणी पूर्णपणे लीन व्हावे, हाच या कथेचा मुख्य धार्मिक हेतू आहे. कथेद्वारे त्यांनी नैमिषारण्यातील सूतजी आणि शौनक ऋषींमधील पवित्र संवादाचे अत्यंत सुंदर रितीने रसग्रहण केले.



## भागवत ग्रंथाचे मनोभावे पूजन

सोमवारी कथेच्या प्रारंभी अत्यंत भक्तीमय वातावरणात मुख्य यजमान पंकज देशमुख, सौ. ऋतुजा देशमुख आणि सौ. कल्पनाताई देशमुख यांनी श्रीमद् भागवत ग्रंथाचे वाजत-गाजत महापूजन केले. व्यासपीठावर विराजमान पंडित सुदर्शनजी शर्मा शास्त्री यांचे आदराने स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नयनाताई देशमुख यांनी केले, तर नितीन जोशी यांनी पंडितजींचे पुष्पहाराने स्वागत करून त्यांचे आशीर्वाद घेतले. त्यानंतर उपस्थित शेकडो भाविकांच्या जयघोषात आणि 'हरे कृष्ण'च्या गजरात महाआरती होऊन कथेला प्रारंभ झाला. 'भागवत ऐकण्याची केवळ इच्छा होणे, हे देखील पूर्वपुण्याईचे लक्षण आहे,' या पंडितजींच्या विधानाने संपूर्ण गोकुळ धाम भक्तीच्या चैतन्याने न्हाऊन निघाले होते.

# जीएमसीतील रुग्णसेवेवर प्रश्नचिन्ह; आमदार पठाण यांची मंत्र्यांकडे तक्रार



**अकोला :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयातील (जीएमसी) रुग्णसेवेच्या व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या एका घटनेची दखल आता राज्यस्तरावर घेण्यात आली आहे. ब्रेन स्ट्रोकग्रस्त पतीला उपचारासाठी रुग्णालयात आणल्यानंतर स्ट्रेचर, व्हीलचेअर अथवा मदतीसाठी कर्मचारी उपलब्ध न झाल्याने एका आदिवासी महिलेने पतीला पाठीवर उचलून रुग्णालयात नेल्याचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर आमदार साजिद खान पठाण यांनी वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे तक्रार दाखल करून सखोल चौकशीची मागणी केली आहे.

घटनेच्या वेळी रुग्णालयात पुरेसे स्ट्रेचर व व्हीलचेअर उपलब्ध होते का, रुग्णांना तातडीची मदत करण्यासाठी जबाबदार कर्मचारी कोण होते आणि रुग्ण सहाय्यता व्यवस्था प्रभावीपणे कार्यरत आहे का, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय रुग्णालयात वॉर्डबॉय, रुग्णसहायक, सुरक्षा रक्षक आणि इतर सहाय्यक कर्मचारी पुरविणाऱ्या 'क्रिस्टल' व 'स्मार्ट' या खासगी एजन्सींच्या कामकाजाचीही तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. संबंधित एजन्सींनी करारानुसार आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून दिले होते का, उपस्थिती नोंदी आणि सेवा अटींचे पालन झाले का, याची पडताळणी करून दोषी आढळल्यास आवश्यक कारवाई करण्यात यावी, असे निवेदनात म्हटले आहे. कार्यालय प्रमुख म्हणून अधिष्ठात्यांनी या प्रकरणात तत्काळ आणि प्रभावी कारवाई करणे अपेक्षित होते. त्यामुळे त्यांच्या भूमिकेचीही चौकशी व्हावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या तक्रारीची दखल वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी घेतली.

# श्री समर्थ पब्लिक स्कूल अँड जूनियर कॉलेज रिधोराच्या स्मित भरणेची राज्यस्तरावर निवड

प्रतिनिधी ९ जून

**अकोला :** महाराष्ट्र राज्य बॉक्सिंग असोशियन अजिंक्यपद स्पर्धा २०२६. १ली कब क्लास,(ळ -११) मधून स्मित कमलेश भरणे याची निवड झाली जळगाव खान्देश होणाऱ्या राज्यस्तर स्पर्धेसाठी त्याची निवड झाली. इयत्ता चौथी मधे शिकत असलेला स्मित कमलेश भरणे हा समर्थ पब्लिक स्कूलचा विद्यार्थी आहे



श्री समर्थ शिक्षण वा क्रीडा प्रसारक मंडळ समूहाचे अध्यक्ष प्रा.नितीन बाठे यांनी स्मित कमलेश भरणे चे कौतुक करीत पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या. खेळाडूंना आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा शाळेतर्फे उपलब्ध करून दिल्या जातील असे त्यांनी यावेळी सांगितले. संस्थेचे उपाध्यक्ष राजेश बाठे सर, संचालिका जयश्री बाठे मॅडम, किशोर कोरपे सर, योगेश जोशी सर, डॉ. किशोर रत्नपारखी सर, मुख्याध्यापिका डॉ. उषालता वानखेडे, उपमुख्या ध्यापक प्रेमेंद्र पळसपगार यांनी ही यशस्वी खेळाडूंचे कौतुक केले आहे.या खेळाडूंना , क्रीडा शिक्षिका, सुनील दांडळे,अनिता गंगतीरे ,क्रीडा शिक्षक अंकुश ढोणे, यांचे मार्गदर्शन लाभले.

# सैन्य दलातून पोलीस दलात निवड झालेल्या नितेश इंगळे यांचा ह्यूमन राईट जस्टीस असोसिएशनतर्फे सत्कार

प्रतिनिधी ९ जून

**अकोला :** भारतीय सैन्य दलात १७ वर्षे प्रामाणिकपणे व निष्ठेने सेवा बजावणारे नितेश इंगळे हे देशाचे खरे सुपुत्र आहेत. देशाची सीमा आणि देशवासीयांच्या सुरक्षेसाठी अहोरात्र कार्य करणारे सैनिक हेच भारताचे खरे हिरो आहेत. नितेश इंगळे यांनी भारतीय सैन्य दलात उल्लेखनीय सेवा बजावत देशसेवेचे महान कार्य केले आहे. आता त्यांची महाराष्ट्र पोलीस दलामध्ये निवड झाल्याने त्यांच्या कार्याला नवे परिमाण लाभले आहे. या निमित्ताने ह्यूमन राईट जस्टिस असोसिएशन,



अकोला यांच्या वतीने नितेश इंगळे यांचे स्वागत करण्यात आले. तसेच शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी रवींद्र गवई ,जिल्हा अध्यक्ष,ह्यूमन राईट जस्टिस असोसिएशन अकोला यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी राष्ट्रीय सचिव संघपाल शिरसाठ, प्रा. सुरेश मोरे, महिला अध्यक्षा हर्षाताई धीरज खंडारे, सुरेखाताई राऊत, राजविलास वानखडे, राजेश खांडेकर, संजय मेश्राम, शालूताई नाईक, प्रभाकर कवडे उपस्थित होते.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना

## ♦ ऑनलाईन तपासणी आता तालुका स्तरावर

प्रतिनिधी ९ जून

**अकोला :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत नव्याने अर्ज स्वीकारणे सध्या बंद आहे तथापि, लाभार्थी महिलांना योजनेचा लाभ मिळण्यात काही अडचण आल्यास त्यांच्या अर्जाची स्थिती तपासण्यासाठी तालुका स्तरावर सुविधा सुरू करण्यात आली आहे. यापूर्वी ही तपासणी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, अकोला येथे करण्यात येत होती. त्यामुळे ग्रामीण व दूरवरच्या भागातील लाभार्थ्यांना जिल्हा मुख्यालयात ये-जा करण्यासाठी आर्थिक खर्च तसेच वेळेचा अपव्यय सहन करावा लागत होता. लाभार्थ्यांची गैरसोय दूर करण्याच्या उद्देशाने आता अर्जांची ऑनलाइन तपासणी तालुका स्तरावर करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. महिला व बाल विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या बाल विकास प्रकल्प अधिकारी तसेच संरक्षण अधिकारी यांच्या कार्यालयांमार्फत ही प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या निर्णयामुळे लाभार्थ्यांना आपल्या तालुक्यातच अर्जासंबंधी आवश्यक कार्यवाही करून घेता येणार असून त्यांचा प्रवासाचा खर्च, वेळ आणि जिल्हा कार्यालयातील गर्दी कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच लाभार्थ्यांना अधिक जलद व प्रभावी सेवा उपलब्ध होणार आहे. यासंदर्भात संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी व संरक्षण अधिकारी यांना आवश्यक निर्देश देण्यात येणार असून संबंधितांनी आपल्या तालुक्यातील संबंधित कार्यालयाशी संपर्क साधून अर्ज तपासणीची प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे.

# धामणदरीत वाढत आहे किडनीचे आजार

प्रतिनिधी ९ जून

**अकोला :** बार्शीटाकळी तालुक्यातील धामणदरी गावातील पिण्याच्या पाण्यात वाढलेल्या क्षाराच्या प्रमाणामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असून गावात किडनीसंबंधित आजारांचे प्रमाण वाढत असल्याची चिंता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. अनेक वर्षांपासून नागरिकांना खारट व क्षारयुक्त पाणी पिण्याची वेळ येत असल्याने विविध आरोग्यविषयक समस्यांमध्ये वाढ होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. विशेषतः किडनीसंबंधित आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांची संख्या वाढत असल्यामुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या गंभीर समस्येची दखल घेत धामणदरी ग्रामस्थांच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते अक्षय राठोड यांनी पंचायत समिती बार्शीटाकळीचे गटविकास अधिकारी (ँअ्ध) यांना निवेदन सादर करून धामणदरी गावात तात्काळ ॅ्ध पाणी शुद्धीकरण प्रकल्प मंजूर करण्याची मागणी केली आहे. गावातील नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी

## ♦ आरओ प्रकल्पासाठी जोरदार मागणी



प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. धामणदरी गावातील नागरिक अनेक वर्षांपासून याच पाण्याचा वापर करत असून त्याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. किडनीसंबंधित आजारांसह इतर शारीरिक व्याधींमध्ये वाढ होत असल्यामुळे ग्रामस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. स्वच्छ पिण्याचे पाणी हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क असून आजही धामणदरीतील नागरिकांना दूषित व क्षारयुक्त पाणी पिण्याची वेळ येत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याबाबत बोलताना अक्षय राठोड यांनी सांगितले की, 'धामणदरी गावातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. अनेक वर्षांपासून ग्रामस्थांना खारट पाण्याचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे गावात ॅ्ध पाणी शुद्धीकरण प्रकल्प उभारणे ही काळाची गरज आहे. प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून तात्काळ कार्यवाही करावी.' अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

ग्रामस्थांनी निवेदनात असेही नमूद करण्यात केले आहे की, सध्या उपलब्ध असलेल्या क्षारयुक्त पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याची मोठ्या प्रमाणात हानी होत असून भविष्यात कोणत्याही नागरिकाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम झाल्यास अथवा जीवितहानी झाल्यास त्याची नैतिक व प्रशासकीय जबाबदारी संबंधित प्रशासन व जबाबदार यंत्रणांवर राहील. तसेच या मागणीवर तात्काळ कार्यवाही न झाल्यास गावकरी आंदोलनाचा पवित्रा उचलणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे..

# घरातून गाय लंपास, पोलिस स्टेशन मध्ये घेतली धाव

प्रतिनिधी ९ जून

**हिवरखेड :** हिवरखेड तेल्हारा मार्गावर असलेल्या मारोती सोळंके यांच्या राहत्या घरातून त्यांची धामणी लाल रंगाची गाय परवा रात्रीला अडची वाजताच्या दरम्यान चोरट्यांनी लंपास केल्याची बाब उघडकीस आली , सकाळी मारोती सोळंके यांनी यांच्या परिवाराच्या मदतीने गाय सर्वत्र शोधली परंतु कुठेच सापडली नाही, शेवटी सोळंके यांनी पोलिस स्टेशन मध्ये धाव घेतली, हिवरखेड बीट अंमलदार हे यांच्या गायचा शोध घेत आहेत, चोरीच्या ह्या घटनांन जवळून नागरिकांनी सावध राह्यला पाहिजे व पोलिसांनी सुद्धा या घटनेना आळा घालण्यासाठी काही उपाय योजना करायला पाहिजे असे मत सुज्ञ नागरिक व्यक्त करीत आहेत.

# रखरखत्या उन्हात खतासाठी ताटकळ; अकोटमधील शेतकऱ्यांचा संताप वाढला

वि प्रतिनिधी ९ जून

**अकोट:** खरीप हंगामाच्या तोंडावर युरिया व डीएपी खताच्या तुटवड्यामुळे अकोट कृषी बाजारपेठेत शेतकऱ्यांची मोठी गर्दी झाली असून खत मिळविण्यासाठी अनेक शेतकरी व महिला शेतकरी रविवारी रात्रीपासूनच रांगेत उभे असल्याचे चित्र सोमवारी पाहायला मिळाले. पिण्याचे पाणी व इतर मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले. खत वितरणादरम्यान काही ठिकाणी शेतकरी व कृषी सेवा केंद्रांच्या प्रतिनिधींमध्ये वादावादीही झाली. उपलब्ध साठा मर्यादित असल्याने प्रत्येक शेतकऱ्याला टोकन देऊन युरियाची तीन पोती व डीएपीची दोन पोती अशा मर्यादित



प्रमाणात खतवाटप करण्यात आले. मात्र हे प्रमाण अपुरे असल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. दरम्यान, जिल्हा स्तरावरून अकोट तालुक्यासाठी राखीव कोट्यातून सुमारे १५० टन युरिया व ५० टन डीएपी खताचा साठा पाठविण्यात आला होता. तरीही वाढत्या मागणीमुळे हा साठा अपुरा पडल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. एनएफएलचा अतिरिक्त साठा जिल्ह्यात दाखल झाल्यानंतर त्यातील काही हिस्सा अकोटला मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे. खतटंचाईमुळे अल्पभूधारक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांना सर्वाधिक फटका बसत असल्याचे दिसून आले. रखरखत्या उन्हात महिला शेतकरीही तासन्?तास रांगेत उभ्या असल्याचे चित्र होते. याचवेळी खत वितरणासाठी कोणताही लोकप्रतिनिधी पुढाकार घेताना दिसून न आल्याने शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. वेळेवर व पुरेशा प्रमाणात खत उपलब्ध न झाल्यास पेरणी व पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त करत शेतकऱ्यांनी तातडीने अतिरिक्त खतसाठा उपलब्ध करून वितरण व्यवस्था सुरळीत करण्याची मागणी केली आहे.

# प्रा. प्रकाश डवले यांची शिवसेना विदर्भ प्रवक्तेपदी निवड

प्रतिनिधी ९ जून

**अकोला :** शिवसेना (शिंदे गट) आयोजित अकोला जिल्हा पदाधिकारी व एसआयआर मार्गदर्शन शिबिर ८ जून रोजी गोरक्षण रोडवरील 'शुभमंगल मंगल कार्यालय' येथे उत्साहात पार पडले. यावेळी अकोला संपर्क मंत्री तथा राज्याचे परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांच्यावतीने शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते प्रा. प्रकाश डवले यांची शिवसेना पक्षाच्या 'विदर्भ प्रवक्तेपदी' अधिकृत घोषणा करण्यात आली. त्यांच्या या निवडीने अकोल्यासह संपूर्ण विदर्भातील राजकीय व सामाजिक वर्तुळातून आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रा. प्रकाश डवले यांची ही निवड त्यांच्या अनेक वर्षांच्या निस्सीम समाजसेवेचे आणि संघटन कौशल्याचे द्योतक आहे. त्यांनी आजवर राबवलेले विविध उपक्रम पक्षासाठी

## अकोला संपर्क मंत्री ना. प्रताप सरनाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत सोहळा



आणि समाजासाठी दिशादर्शक ठरले आहेत. आरोग्य सेवेमध्ये सर्वसामान्यांसाठी मोफत रक्त तपासणी शिबिरे आणि आरोग्य तपासणी शिबिरांचे सातत्याने आयोजन करून त्यांनी हजारो रुग्णांना वैद्यकीय मदत मिळवून दिली आहे. शैक्षणिक क्रांती द्वारे गुणवंत विद्यार्थ्यांचा जाहीर सत्कार सोहळा आणि स्पर्धा परीक्षा देणाऱ्या तरुणांसाठी 'विद्यार्थी मार्गदर्शन शिबिरांचे' आयोजन करून त्यांनी शेकडो विद्यार्थ्यांना यशाचा मार्ग दाखवला आहे. तसेच धार्मिक क्षेत्रातही त्यांचे मोठे योगदान आहे. तसेच शिवसेना उपक्रम व संवाद यात्रेदरम्यान शिवसेनेचे ध्येय-धोरण तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी विविध जनसंपर्क मोहिमा प्रभावीपणे राबवल्या आहेत. या सोहळ्याला राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड, आ. बच्चू कडू, अकोला लोकसभा संपर्कप्रमुख डॉ. राजन साळवी, उपनेते गोपीकिशन बाजोरिया, युवा सेना सचिव विठ्ठल सरप, संपर्कप्रमुख संजना गवळी, जिल्हाप्रमुख नारायण गव्हाणकर, श्रीरंगदादा पिंजरकर, चंद्रशेखर पांडे गुरुजी, अश्विन नवले, उषा विरक, रेखा राऊत, महानगरप्रमुख राजेश मिश्रा, योगेश अग्रवाल, अनिल मालगे, डॉ. अभिजित प्रकाश डवले, आदित्य ठाकूर यांच्यासह शिवसेनेचे विदर्भातील सर्व प्रमुख पदाधिकारी, महिला आघाडी आणि हजारो कार्यकर्ते उपस्थित होते. प्रा. डवले आपल्या नियुक्तीनंतर कृतज्ञता व्यक्त करताना म्हणाले, पक्षप्रमुख आणि वरिष्ठ नेत्यांनी माझ्या कार्याची दखल घेऊन जी जबाबदारी दिली आहे, तिला मी पूर्ण न्याय देण्याचा प्रयत्न करेन. विदर्भातील जनतेचे प्रश्न आणि पक्षाची भूमिका अत्यंत प्रभावीपणे आणि अभ्यासू वृत्तीने मांडणे हेच माझे मुख्य ध्येय असेल.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६
मॉ. गायत्री प्राथमिक शाळा व
स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर. अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर,
प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!
वैशिष्ट्ये :
1)अनुभवी शिक्षकवृंद
2)सुसज्ज पायाभूत ईमारत
3)दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
4)सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
5)आनंददायी शिक्षण पध्दती
6)CCTV ची सुविधा
7)कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
8)सुसज्ज प्रयोगशाळा
इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरू आहे.
1)इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
2)इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
3)शालेय पोषण आहार

माँ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790, 9960437366

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. ९ जून २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# मोबदला न मिळाल्यास रेल्वेचे काम रोखणार

## रेल्वे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा एल्गार : एसडीओ कार्यालयावर ठिय्या आंदोलन



प्रतिनिधी ९ जून

**उमरखेड** : रेल्वे प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या शेतजमिनींमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई अद्याप न मिळाल्याने संतप्त झालेल्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी सोमवारी (दि. ८) उपविभागीय अधिकारी (एसडीओ) कार्यालयावर ठिय्या आंदोलन करत शासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. पाईपलाईन, बोअरवेल, विहिरी, फळझाडे, गोठे आणि इतर साहित्याच्या नुकसानीचा मोबदला तात्काळ द्यावा, अन्यथा रेल्वेचे काम बंद पाडण्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला.

### "मोबदला मिळेपर्यंत रेल्वेचे काम बंद"

■ "रेल्वे प्रकल्पामुळे झालेल्या नुकसानीचा योग्य मोबदला शेतकऱ्यांना मिळाल्याशिवाय रेल्वेचे काम सुरू होऊ देणार नाही. शासनाने तात्काळ निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल," असा इशारा शेतकरी नेते संजय बिजोरे पाटील यांनी दिला.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, रेल्वे प्रकल्पासाठी भूसंपादन करताना त्यांच्या शेतातील विविध मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. मात्र या नुकसानीची भरपाई मिळण्यासाठी अनेक वर्षांपासून जिल्हाधिकारी, भूसंपादन अधिकारी आणि महसूल प्रशासनाकडे पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. शेतकरी नेते संजय बिजोरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली यापूर्वीही अनेक वेळा आंदोलने व आमरण उपोषणे करण्यात आली होती. तरीही प्रशासनाने दखल घेतली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष आहे. खरीप हंगामाची सुरुवात झाल्याने पेरणी, बियाणे व खतांसाठी निधीची गरज असताना हक्काचा मोबदला रखडल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांनी रेल्वे प्रकल्पामुळे शेतीवर होत असलेल्या परिणामांची व्यथा मांडली. रेल्वे विभागाने उभारलेल्या विद्युत खांबांमुळे शेतात पाणी साचत असून शेतीची कामे प्रभावित होत आहेत. प्रकल्पामुळे कोणताही प्रत्यक्ष लाभ न होता उलट शेतीचे नुकसान वाढल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला.

या आंदोलनात केशव सूर्यवंशी, ओमप्रकाश चव्हाण, दीपक चव्हाण, देविदास वाळूतकर, बालाजी नरवाडे, अतुल पाटील यांच्यासह तालुक्यातील अनेक रेल्वे प्रकल्पग्रस्त शेतकरी सहभागी झाले होते.

# दिग्रसमध्ये गांजा जप्त; एकाला अटक

प्रतिनिधी ९ जून



### स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

**यवतमाळ** : स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दिग्रस तालुक्यातील विटाळा येथे छापा टाकून २.४४५ किलो गांजा जप्त केला. या प्रकरणी एका संशयिताला अटक करण्यात आली असून त्याच्याविरुद्ध अमली पदार्थ व मन:प्रभावी पदार्थ अधिनियम (एनडीपीएस) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दिग्रस पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना विटाळा येथील दिलीप शंकर मससे (वय ३८) हा त्याच्या राहत्या घरी गांजा साठवून त्याची विक्री करीत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने विटाळा येथे जाऊन संबंधितास ताब्यात घेतले. त्याच्या घराची कायदेशीर झडती घेतली असता २.४४५ किलो वजनाचा व ३६ हजार ६७५ रुपये किमतीचा गांजा आढळून आला. पंचांसमक्ष हा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी दिग्रस पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ०४८९/२०२६ नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई कुमार चिंता, अशोक थोरात आणि सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाई करणाऱ्या पथकात पवन राठोड, शिवशंकर कायदे, बबलू चव्हाण, मिथुन जाधव, किशोर झेडेकर, सोहेल मिर्झा, अमित झेंडेकर, अमित कुंबरे आणि रवी मोरलेवार यांचा समावेश होता.

अमली पदार्थांच्या सेवन, विक्री व तस्करीविरोधातील विशेष मोहीम यापुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी सांगितले असून अशा प्रकारच्या गैरकृत्यांची माहिती नागरिकांनी पोलिसांना द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. माहिती देणाऱ्याची ओळख गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

# अंशकालीन स्त्री-परिचारिकांचा १५ जूनला मोर्चा

प्रतिनिधी ९ जून

**यवतमाळ** : अंशकालीन स्त्री-परिचारिकांच्या विविध प्रलंबित मागण्या तातडीने मार्गी लावाव्यात, या मागणीसाठी आयटक संलग्न महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते अंशकालीन स्त्री-परिचर संघटना, जिल्हा शाखा यवतमाळच्या वतीने १५ जून रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयावर मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

संघटनेच्या माहितीनुसार, अंशकालीन स्त्री-परिचारिकांच्या मानधनात १ एप्रिल २०२६ पासून तीन हजार रुपयांची वाढ मंजूर करण्यात आली असून मासिक मानधन सहा हजार रुपये करण्यात आले आहे. मात्र अद्याप वाढीव मानधनाची अंमलबजावणी झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच मानधन नियमितपणे मिळत नसल्याने अनेक परिचारिकांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

अंशकालीन कर्मचारी असतानाही त्यांच्याकडून पूर्णवेळ काम करून घेतले जात असल्याचा मुद्दाही संघटनेने उपस्थित केला आहे. वाढीव मानधनासह फरकाची रक्कम अदा करणे, किमान वेतन लागू करणे, रजा व सामाजिक सुरक्षा लाभ देणे, सेवावयोमर्यादा ६५ वर्षे करणे, कायमस्वरूपी सेवेत सामावून घेणे, गणवेश व ओळखपत्र उपलब्ध करून देणे आदी मागण्या मोर्चाद्वारे मांडण्यात येणार आहेत.

हा मोर्चा सकाळी ११ वाजता श्रमशक्ती भवन येथून निघणार असून मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन संघटनेने केले आहे.

# लोकशाहीची गळचेपी; सत्ताधा-यांनी मतदारांचा आवाज दाबला : सचिन नाईक

प्रतिनिधी ९ जून

**यवतमाळ** : स्थानिक प्राधिकरण मतदारसंघाच्या निवडणुकीत लोकशाही मूल्यांची पायमल्ली झाली असून सत्ताधाऱ्यांनी लोकशाहीचे धिंडवडे काढले आहेत, अशी टीका काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन नाईक यांनी सोमवारी आयोजित पत्रकार परिषदेत केली.

महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार साहेबराव कांबळे यांनी स्थानिक प्राधिकरण मतदारसंघाच्या



निवडणुकीतून माघार घेतली. ही माघार दबावतंत्राचा परिणाम असल्याचा दावा नाईक यांनी केला. निवडणूक प्रक्रियेत पैशाचा आणि सत्तेचा गैरवापर झाल्याने लोकशाही धोक्यात आली असून हा प्रकार लोकशाही व्यवस्थेसाठी घातक असल्याचे त्यांनी म्हटले.

उमेदवारांच्या माघारीमुळे मतदारांना पर्यायापासून वंचित राहावे लागले. त्यामुळे निवडणुकीची स्पर्धात्मकता आणि पारदर्शकता बाधित झाली असून सत्ताधाऱ्यांचा वाढता उन्माद लोकशाही व्यवस्थेला मारक ठरत असल्याची टीकाही त्यांनी केली.

या प्रकरणाबाबत काही नगरसेवकांनीही नाराजी व्यक्त केली असून संपूर्ण घडामोडींची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. काँग्रेससह अन्य पक्षांच्या कार्यकर्त्यांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करून प्रकरणाची दखल घेण्याची मागणी केल्याचे नाईक यांनी सांगितले.

जिल्ह्याच्या स्थानिक प्रश्नांशी थेट संबंध नसलेल्या व्यक्तीला उमेदवारी देण्यात आल्याबद्दलही त्यांनी आक्षेप नोंदविला. स्थानिक नेतृत्वाला डावलून बाहेरील व्यक्तीला संधी देणे म्हणजे मतदारांच्या भावनांचा अनादर असल्याचे ते म्हणाले.

सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेविरोधात जनतेचा आवाज अधिक प्रभावीपणे मांडला जाईल आणि लोकशाही मूल्यांच्या संरक्षणासाठी विरोधी पक्ष म्हणून आक्रमक भूमिका घेतली जाईल, असा इशाराही नाईक यांनी दिला. पत्रकार परिषदेला आरीज बेग, संजय ठाकरे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

# वाहतूक कोंडीवर मनसेचा इशारा; रस्ता मोकळा न झाल्यास तीव्र आंदोलन

प्रतिनिधी ९ जून

**आर्णी** : आर्णी शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असून, वाहतूक व्यवस्था तातडीने सुरळीत करावी अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मनसेचे उपजिल्हाप्रमुख सचिन यलगंधेवार यांनी दिला आहे.

यासंदर्भात मनसेच्या वतीने मुख्याधिकारी तसेच पोलीस ठाणेदार यांना यापूर्वी निवेदन देण्यात आले होते. मात्र, प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नसल्याचा आरोप मनसेने केला आहे. त्यामुळे आता आंदोलनाचे निवेदन देण्यात आले असून, लवकरच मोठ्या प्रमाणावर आंदोलन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

आर्णी शहराची लोकसंख्या मोठी असून नागरिकांच्या दैनंदिन ये-जा करण्यासाठी एकच प्रमुख रस्ता उपलब्ध आहे. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याने दुचाकी, चारचाकी वाहनचालक तसेच पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः



शाळा सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर ही समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्यासाठी नगरपरिषद आणि पोलीस प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, रस्त्यावरील अतिक्रमणे हटवून वाहतूक सुरळीत करावी तसेच नागरिकांना होणारा त्रास कमी करावा, अशी मागणी मनसेने केली आहे. "आमच्या वतीने नगरपरिषद आणि पोलीस प्रशासनाला वारंवार निवेदने देण्यात आली; मात्र अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. रस्ता सुरळीत न झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेना आर्णी तालुका व शहरातील नागरिकांना सोबत घेऊन मोठ्या प्रमाणावर आंदोलन करेल," असा इशारा सचिन यलगंधेवार यांनी दिला. यावेळी कपिल ठाकरे यांच्यासह मनसेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पीक विमा व कर्जमाफीसाठी शेतकऱ्यांचा एल्गार; १६ ग्रामपंचायतींचे गावबंदी ठराव

प्रतिनिधी ९ जून

**प्रमुख मागण्या :** नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने पीक विमा द्या. दोन लाख रुपयांपर्यंत सरसकट कर्जमाफी लागू करा. कर्जमुक्त शेतकऱ्यांना त्वरित पीक कर्ज उपलब्ध करा. मंत्री व सत्ताधारी आमदारांना गावबंदीचा इशारा. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा

**यवतमाळ** : गतवर्षीच्या अतिवृष्टी आणि ओल्या दुष्काळामुळे मोठे नुकसान सहन करावे लागलेल्या शेतकऱ्यांना अद्याप पीक विम्याचा लाभ न मिळाल्याने जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर महागाव, उमरखेड आणि पुसद तालुक्यांतील १६ ग्रामपंचायतींनी विशेष ग्रामसभांमध्ये ठराव मंजूर करून पालकमंत्र्यांसह मंत्री व सत्ताधारी आमदारांना गावबंदीचा इशारा दिला आहे.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पुढाकाराने मंजूर करण्यात आलेल्या या ठरावांमध्ये पीक विमा तातडीने वितरित करावा, दोन लाख रुपयांपर्यंतची बिनशर्त कर्जमाफी जाहीर करावी आणि कर्जमुक्त शेतकऱ्यांना त्वरित पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. संघटनेचे नेते मनीष जाधव यांनी प्रशासनावर गंभीर आरोप करताना सांगितले की, जिल्हा प्रशासनाच्या दप्तरदिरंगाईमुळे आणि पीक विमा कंपनीशी समन्वयाच्या अभावामुळे नुकसानग्रस्त पिकांची माहिती वेळेत सादर झाली नाही. परिणामी हजारो शेतकरी हक्काच्या विमा लाभापासून वंचित राहिले आहेत.सततची नापिकी, वाढता उत्पादन खर्च, कर्जबाजारीपणा आणि शेतमालाला मिळत नसलेला भाव यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. पेरणीचा हंगाम तोंडावर असतानाही अनेकांना पीक कर्ज मिळत नसल्याने शेती पडीत राहण्याची भीती व्यक्त होत आहे.

मागण्यांबाबत शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास गावागावांत आणखी गावबंदीचे ठराव मंजूर करून त्याच्या प्रती केंद्र सरकार, पंतप्रधान कार्यालय आणि गृहमंत्रालयाकडे पाठविण्यात येतील, असा इशारा संघटनेने दिला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी आंदोलन अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# शिवराज्याभिषेक दिन; छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास दुग्धाभिषेक



प्रतिनिधी ९ जून

**उमरखेड** : रयतेचे राजे, बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त उमरखेड शहरात शनिवारी (दि. ६ जून) उत्साहपूर्ण आणि शिवमय वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. स्थानिक मराठा सेवा संघ, शिवजयंती उत्सव समिती आणि छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हा सोहळा पार पडला.

छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित कार्यक्रमास उमरखेड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसनराव वानखेडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभली. सकाळी मुख्य ध्वजस्तंभावर मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास दुग्धाभिषेक करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. उपस्थित शिवभक्तांनी घोषणाबाजी करत महाराजांना त्रिवार अभिवादन केले.

यावेळी बोलताना आमदार किसनराव वानखेडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य, पराक्रम आणि दूरदृष्टीचा गौरव केला. शिवाजी महाराजांचे विचार आणि आदर्श समाजात रुजविणे हीच त्यांना खरी मानवंदना ठरेल, असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास ॲड. संतोष जैन, चितांगराव कदम, सुरेश कदम, गजानन देशमुख, हिंगमिरे सर, जितेंद्र पवार, प्रवीण सूर्यवंशी, वसंतराव देशमुख, पत्रकार विलासराव चव्हाण, सविता चंद्रे, संदीप ठाकरे, दिलीप सुरते, प्रमोद देशमुख, सविता कदम, प्रकाश शिंदे, डॉ. संजय तेला, अभय पवार, रमेश चव्हाण यांच्यासह मराठा सेवा संघ, उत्सव समिती आणि पुतळा समितीचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने शिवभक्त उपस्थित होते.

# १२ जून रोजी लायन्स क्लबचा पदग्रहण सोहळा

प्रतिनिधी ९ जून

**यवतमाळ** : लायन्स क्लब यवतमाळ यांच्या वतीने सन २०२६-२७ या वर्षासाठी नवनियुक्त कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा शुक्रवार, दि. १२ जून रोजी सायंकाळी ७ वाजता हॉटेल राधामंगल क्लार्क्स इन येथे आयोजित करण्यात आला आहे.

या सोहळ्यात अध्यक्षपदी अशोक पटेलपईक, सचिवपदी विवेक चमेडीया आणि कोषाध्यक्षपदी डॉ. दीपक घरझोडे यांच्यासह संचालक मंडळ व विविध पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारंभ पार पडणार आहे. कार्यक्रमासाठी पदग्रहण अधिकारी म्हणून निशिकांत प्रतापे उपस्थित राहणार असून, प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून राजे मुधोजी भोसले यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच इंडक्शन ऑफिसर म्हणून विलास बुटले कार्यभार सांभाळणार आहेत. लायन्स क्लबच्या सेवाभावी कार्याची परंपरा अधिक बळकट करत समाजोपयोगी उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प नव्या कार्यकारिणीद्वारे करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. या पदग्रहण सोहळ्यास सर्व लायन्स सदस्य, मान्यवर आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्षा दीपा जोशी, सचिव रागिणी गावंडे, कोषाध्यक्ष सुरजितसिंग रावत, प्रकल्प संचालक संजय मंत्री, सह-प्रकल्प संचालक राजकुमार अग्रवाल तसेच प्रसिद्धी प्रमुख रमेश छेडा यांनी केले आहे.

# बिनविरोध निवडीस स्थगिती द्या

प्रतिनिधी ९ जून

### नगरसेवक-मतदारांची चौकशीची मागणी



**यवतमाळ** : यवतमाळ स्थानिक प्राधिकरण मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणुकीत महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार साहेबराव कांबळे यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर या निर्णयावरून वाद निर्माण झाला आहे. नगरसेवक, स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य आणि मतदारांच्या वतीने जिल्हाधिकारी तथा मुख्य निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल करून माघारीमागील कारणांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, कांबळे यांची माघार स्वेच्छेने नसून राजकीय दबाव, आर्थिक प्रलोभन आणि अनुचित प्रभावाखाली घेण्यात आली असल्याची शक्यता आहे. त्यामुळे या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून चौकशी पूर्ण होईपर्यंत बिनविरोध निवडीची प्रक्रिया स्थगित ठेवावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

निवेदनात लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ मधील तरतुदींचा उल्लेख करत उमेदवारावर दबाव आणणे अथवा आर्थिक आमिष दाखविणे हे भ्रष्ट आचरणाच्या कक्षेत येत असल्याचा दावा करण्यात आला आहे. एका उमेदवाराच्या माघारीमुळे उर्वरित उमेदवार बिनविरोध निवडून येणे म्हणजे मतदारांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवण्यासारखे असल्याचेही तक्रारदारांनी नमूद केले आहे.

यासोबतच तक्रारदारांनी १० मागण्या जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडल्या आहेत. यामध्ये माघारीमागील कथित आर्थिक व्यवहार आणि दबावाची स्वतंत्र चौकशी, चौकशी पूर्ण होईपर्यंत निकालाला स्थगिती, दोषींवर कायदेशीर कारवाई, मतदारांना 'नोटा'चा पर्याय उपलब्ध करून देणे, मतदार यादीतील त्रुटींची तपासणी आणि सर्व तक्रारींवर कारणयुक्त लेखी निर्णय देण्याचा समावेश आहे.

दरम्यान, या प्रकरणासंदर्भात प्रत्यक्षदर्शी मतदार व लोकप्रतिनिधींची शपथपत्रे तसेच अन्य पुरावे सादर करण्यात येणार असल्याचे तक्रारदारांनी म्हटले आहे. या निवेदनावर निवडणूक प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे जिल्ह्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# वन्यप्राण्यांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर; निधी खर्चूनही तलाव कोरडे

प्रतिनिधी ९ जून

### बहुजन मुक्ती पार्टीचा आंदोलनाचा इशारा

**दारव्हा** : यवतमाळ जिल्ह्यासह दारव्हा तालुक्यातील विविध वन परीक्षेत्रांमध्ये वन्यप्राण्यांसाठी लाखो रुपये खर्च करून तयार करण्यात आलेले तलाव व पाणवठे उन्हाळ्याच्या तडाख्यात पूर्णपणे कोरडे पडल्याचा आरोप बहुजन मुक्ती पार्टीने केला आहे. पाण्याअभावी वन्यप्राणी जंगलातून बाहेर पडून गावांकडे, शेतशिवारात व मानवी वस्त्यांमध्ये येत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

वन्यजीवांच्या संरक्षणासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर करून तलाव खोदकाम व जलसंधारणाची कामे करण्यात आली. मात्र उन्हाळ्याच्या काळात या पाणवठ्यांमध्ये पाणी उपलब्ध नसल्याने या कामांच्या परिणामकारकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. लाखो रुपयांचा निधी खर्च झाल्यानंतरही वन्यप्राण्यांना पिण्याचे पाणी मिळत नसेल, तर निधीचा योग्य वापर झाला का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

बहुजन मुक्ती पार्टीचे यवतमाळ-वाशीम लोकसभा अध्यक्ष बिमोद मुधाने यांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. "वन्यप्राणी तहानेने व्याकुळ होऊन गावांमध्ये येत आहेत, तर प्रशासन केवळ कागदोपत्री कामे पूर्ण झाल्याचे दाखवत आहे. वन्यजीवांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या या निष्क्रियतेचा आम्ही तीव्र निषेध करतो," असे त्यांनी म्हटले.

मुधाने यांनी वन विभागाकडे तातडीने सर्व कोरडे तलाव भरून काढण्याची, टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठा सुरू करण्याची तसेच या परिस्थितीस जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी केली आहे. मागण्या मान्य न झाल्यास वन विभागाच्या कार्यालयासमोर तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

"वन्यप्राण्यांसाठी मंजूर झालेला निधी खर्च झाला, मात्र प्राणी तहानेने त्रस्त होत असतील तर हा केवळ हलगर्जीपणा नसून वन्यजीवांवरील अन्याय आहे," असा आरोपही त्यांनी केला. सध्या दारव्हा तालुक्यातील अनेक भागांत वन्यप्राण्यांची वर्दळ वाढल्याने नागरिकांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

त्यामुळे प्रशासनाने तातडीने परिस्थितीची दखल घेऊन प्रभावी उपाययोजना कराव्यात, अन्यथा बहुजन मुक्ती पार्टी व्यापक आंदोलन उभारेल, असा इशारा बिमोद मुधाने यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिला आहे.

५
सिटी न्यूज अमरावती
मंगळवार, दि. ९ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# कर्जबाजारी शेतकऱ्याची विष घेऊन आत्महत्या

**मोर्शी :** येथून जवळच असलेल्या निंभी येथील एका ६६ वर्षीय शेतकऱ्याने कर्जबाजारीपणाला कंटाळून विष प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना ८ जून रोजी उघडकीस आली. बाळकृष्ण आकाराम खडसे (६६) रा. निंभी असे मृतक इसमाचे नाव आहे. त्यांच्याकडे मौजा लाडकी शेतशिवारात ७ एकर शेती असून मागील वर्षी त्यांनी सावकारी व सोसायटीचे कर्ज घेतले होते; मात्र नैसर्गिक अवकृपेमुळे कोणत्याही प्रकारचे पीक हाती आले नाही. परिणामी नगदी पीक असलेल्या सोयाबीनच्या पिकाची रोटावेटर फिरवून शेताताच विल्हेवाट लावण्यात आली. त्यामुळे पहिलेच असलेल्या कर्जाची पूर्णतः परतफेड होऊ शकली नाही. आता पुन्हा शेतीच्या पेरणीचे तोंडावर दिवस आले असताना बाळकृष्ण खडसे हे नेहमीच विवंचनेत राहत होते. शनिवार ६ जून रोजी ते बहिरम येथील आपल्या नातेवाईकांकडे गेले व दुपारी दीड वाजताच्या दरम्यान नातेवाईकांच्या शेतात जाऊन विष प्राशन केले.

# वादळासह पावसाचा शहराच्या वीज यंत्रणेवर परिणाम

## खंडित झालेल्या ५ उपकेंद्राचा वीज पुरवठा युध्द पातळीवर पूर्ववत

प्रतिनिधी ९ जून

**अमरावती :** संध्याकाळी ५ वाजे दरम्यान झालेल्या प्रचंड वादळासह पावसाचा परिणाम होऊन अमरावती शहरातील ५ उपकेंद्रे बाधित झाली होती. परंतू वादळ थांबताच महावितरण कर्मचाऱ्यांनी कामाला युध्दस्तरावर गती देवून प्रथम बाधित झालेल्या उपकेंद्राचा वीज पुरवठा काही तासातच पुर्ववत केला आहे. परंतू अद्याप उपकेंद्रापासून ग्राहकांना होणारा वीज पुरवठ्याचे काम गतीने सुरू असून वीज ग्राहकांनी सहकार्य करण्याचे आवाहन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले आहे.



पावसासह वादळाचा प्रचंड वेगामुळे तांत्रिक बिघाड निर्माण होऊन ३३ केव्ही वडाळी आणि ३३ केव्ही विद्युत भवन उपकेंद्राचा वीज पुरवठा २२० केव्ही कोंडेश्वर या अतीउच्चदाब उपकेंद्रापासून संध्याकाळी ५ : ८ वाजता बंद पडला. परंतू महावितरणच्या तत्परतेने या दोन्ही उपकेंद्राचा वीज पुरवठा काही मिनिटातच म्हणजे ५:३० वाजता पुर्ववत करण्यात आला. झाड पडून बंद पडलेले कॉंग्रेस नगर उपकेंद्रही ५:३२ ला सुरू करण्यात आले. तसेच २२० केव्ही लालखडी उपकेंद्रातून वीज पुरवठा होणारी ३३ केव्ही पॉवर हाऊस आणि ३३ केव्ही हनुमान नगर उपकेंद्राचा वीज पुरवठा अनुक्रमे २२० केव्ही राहटगाव आणि ३३ केव्ही अकोली उपकेंद्रातून बॅकफिडींगच्या माध्यमातून पुर्ववत करण्यात आला आहे.

वीज दुरूस्तीच्या कार्याला युध्दस्तरावर गती देण्यात आली असून उपकेंद्रानंतर वीज ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी असणारे ९८ पैकी ९६ फिडरचा वीज पुरवठा पुर्ववत करण्यात महावितरणला यश आले आहे. ३३ केव्ही हनुमान नगर उपकेंद्रावरील बाकी असलेल्या दोन फिडरच्या दुरूस्तीचे काम सुरू आहे. तसेच फिडरनंतर महावितरणने रोहित्र निहाय दुरूस्ती कार्याला गती दिली आहे. टप्प्या - टप्प्याने वीज पुरवठा पुर्ववत करण्यात येत आहे. अनेक ठिकाणी झाडे वीज वाहिन्यांवर पडल्याने, ते हचवून वीज पुरवठा दुरूस्त करण्यास थोडा कालावधी लागत आहे. मुख्य अभियंता अशोक साळुंके तसेच अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांचे संपूर्ण परिस्थितीवर लक्ष असून या काळात सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.



### अमरावतीत पुन्हा वादळीपावसाने झोडपले

दुपारी४ वाजता दरम्यान अमरावतीत वादळी वाऱ्यासह अर्धा तास धो -धो पाऊस झाला. यामुळे मान्सून पावसाची सुरुवात झाल्याची अनुभूती नागरिकांना मिळाली.
उन्हामुळे नागरिकांच्या जीवाची लाही लाही होत होती.
मात्र या धो -धो पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून नागरिकांना दिलासा मिळाला आहे. अमरावती पुन्हा पावसाने सोडपल्याने नागरिकांची धावपळ उडाली. अनेक ठिकाणी विद्युत पुरवठा खंडित झाला होता. शहरात अनेक नगरामध्ये अनेक वृक्ष कोसळल्याने बऱ्याच ठिकाणी रात्रभर बत्ती गुल होती. पावसाळ्यापूर्वी महावितरणने उपाययोजना न केल्याने महावितरण प्रति नागरिकांचा रोष जाणवत होता.



**पोलीस महासंचालक सदानंद दाते यांची पोलीस आयुक्त कार्यालयात अमरावती विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक, महेश पाटील, पोलीस आयुक्त राकेश ओला, अमरावती परिक्षेत्राचे पाचही जिल्ह्याचे एसपी, व सर्व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची बैठक झाल्यानंतर पुढील प्रवासाला नाशिक येथे रवाना झाले.**

# तळेगाव दशासर पोलीस स्टेशन कडुन अवैध रेती वाहतुकीवर कारवाई

प्रतिनिधी ९ जून

**अमरावती :** पोलीस अधीक्षक, निकेतन कदम यांनी पो स्टे हददीत वरली जुगार, अवैध दारु विक्री, गावठी हातभटटी व अवैध रेती वाहतुक, गोवंश वाहतुक यांचे विरुदध कठोर कारवाई करणे बाबत सर्व ठाणेदार यांना आदेशित केले आहे.

त्यानुसार आज दिनांक ०८/०६/२०२६ रोजी सकाळी पोलीस स्टेशन तळेगाव दशासर येथील पोलीस अधीकारी व पोलीस अमंलदार यांचे पथक पो स्टे हददीमध्ये अवैध धंदयाचे विरुध्द कारवाई करणे करीता गस्त करीत असतांना मिळालेल्या गोपनिय माहीतीवरुन ०७०० वाजण्याचे सुमारास तळेगाव ते चांदुर रेल्वे रोडवर शेंदुर्जना शेत शिवारात पंचासह कारवाई केली असता एक टाटा ट्रक (हायवा) क्रमांक श्प् २७ ३ऊ ९४९८ मिळुन आल्याने पंचासमक्ष त्याची पाहणी केली असता त्यामध्ये विनारॉयल्टी १० ब्रास काळी रेती मिळुन आली. त्यामुळे ५५,००,०००/-



रुपयांचा ट्रक व १,३०,०००/- रुपयांची १० ब्रास रेती असा एकुण ५६,३०,०००/-रुपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. पोहेकॉ अमर काळे यांचे फिर्यादी रिपोर्ट वरुन चालक हमीद बुदधू लुचे वय ४४ वर्षे रा गवळीपुरा अमरावती व ट्रक मालक मोहमद शकील शेख हबीब रा गणेश पेठ, प्रविण नगर अमरावती याचं विरुध्द पो स्टे तळेगाव दशासर येथे अप क्रमांक १३८/२०२६ कलम ३०२(२), ३(५) भारतीय न्याय संहीता २०२३, कलम ९, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६, कलम ३, ७ सार्वजनिक संपती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ व कलम १३०(१), १७७ मोटरवाहन अधिनियम १९८८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधीकारी चांदूर रेल्वे अशोक थोरात, पोलीस निरीक्षक किरण वानखेडे, स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती यांचे मार्गदर्शानात पो स्टे तळेगाव दशासर येथील ठाणेदार किरण औटे, पोहेकॉ अमर काळे ब नं २०९९, पोशि यशवंत काळे ब नं ४९८ व पोकॉ गौतम गवळे बं न ५१९ यांनी केली आहे.

# बच्चू कडू यांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत सुधारणा करण्याची मागणी

प्रतिनिधी ९ जून



**अमरावती:** विधान परिषद सदस्य तथा माजी राज्यमंत्री आमदार बच्चू कडू यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील त्रुटी दूर करून अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ मिळावा, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात बच्चू कडू यांनी नमूद केले आहे की, २०२६ मध्ये जाहीर झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत अनेक शेतकरी पात्र असूनही विविध कारणांमुळे लाभापासून वंचित राहणार आहेत. अतिवृष्टी, दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती तसेच आर्थिक अडचणींमुळे अनेक शेतकऱ्यांना नियमित कर्जफेड करणे शक्य झाले नाही. त्यामुळे कर्जमाफी योजनेतील पात्रतेच्या अटींमध्ये बदल करून वंचित शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

तसेच, योजनेअंतर्गत देण्यात येणारी ५० हजार रुपयांची प्रोत्साहनपर अनुदान रक्कम १ लाख रुपयांपर्यंत वाढविण्याची मागणी त्यांनी केली आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना अधिक प्रोत्साहन मिळावे आणि भविष्यातही कर्जफेडीची शिस्त कायम राहावी, यासाठी हा निर्णय आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.आ. कडू यांनी महिला, दिव्यांग, अल्पभूधारक शेतकरी, भूदानधारक तसेच इतर वंचित घटकांनाही सरसकट कर्जमाफीचा लाभ देण्याची मागणी केली आहे.

# प्रलंबित मागण्यांकडे दुर्लक्ष; आरटीओ कर्मचारी उद्या लाक्षणिक संपावर

प्रतिनिधी ९ जून

**अमरावती:** राज्यातील मोटार वाहन विभागातील (आरटीओ) कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाने अद्यापही अपेक्षित गांभीर्याने लक्ष न दिल्यामुळे राज्यभरातील कर्मचारी मंगळवार, दि. ९ जून रोजी एक दिवसीय लाक्षणिक संपावर जाणार आहेत. या आंदोलनाद्वारे शासनाचे लक्ष वेधून घेण्याचा निर्धार कर्मचाऱ्यांनी केला आहे.

मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेच्या नेतृत्वाखाली राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालये व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांमधील कर्मचारी या आंदोलनात सहभागी होणार आहेत. संघटनेने यापूर्वी दि. २ जून रोजी दोन तासांचे निदर्शने आंदोलन केले होते. त्यानंतरही मागण्यांबाबत कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने दि. ९ जून रोजी लाक्षणिक संपाचे आयोजन



करण्यात आले आहे. यानंतरही मागण्यांची पूर्तता न झाल्यास दि. १६ जूनपासून राज्यव्यापी बेमुदत संप पुकारण्यात येणार असल्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

**परिवहन मंत्र्यांना निवेदन**

दि. ७ जून रोजी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अमरावती दौऱ्यादरम्यान मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष तथा अमरावती विभागीय अध्यक्ष अनिल मानकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने त्यांची भेट घेऊन प्रलंबित मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी संदीप खवले, अभिजीत गावंडे, अक्षय राठोड, अमोल माटोडे आदी पदाधिकारी उपस्थित होते. संघटनेने आगामी आंदोलनाची माहिती देत कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली. यावर परिवहन मंत्र्यांनी मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेत चर्चा करून योग्य तो निर्णय घेण्याचे आश्वासन दिल्याचे संघटनेने सांगितले.

**तीन टप्प्यांतील आंदोलन**

दि. २ जून – दोन तासांचे निदर्शने आंदोलन

दि . ९ जून – एक दिवसीय लाक्षणिक संप

दि. १६ जून – राज्यव्यापी बेमुदत संप

**मुख्य मागण्या**

ङ वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी व प्रशासकीय अधिकारी पदांच्या २३ पदोन्नती प्रस्तावांना मंजुरी देण्यात यावी.

ङ कार्यालय अधीक्षक पदाचे सेवा प्रवेश नियम तातडीने तयार करावेत.

# पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी अमरावती महाविद्यालयात मेगा कॅम्पस ड्राइव संपन्न



प्रतिनिधी ९ जून

**अमरावती :** पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप व्दारे संचालित, पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी अमरावती येथे अँडवांटमेड एल एल पी, अहमदाबाद या मेडीकल कोडींग क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपनी ने सहभाग घेतला.

या कॅम्पस ड्राइव्ह मध्ये अमरावती सह संपूर्ण महाराष्ट्र तसेच महाराष्ट्र बाहेरील बी. फार्मसी , एम. फार्मसी व फार्म डी झालेल्या ६७८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

सदर कार्यक्रमात अँडवांटमेड इंडिया एल एल पी, अहमदाबाद यांच्या तर्फे श्री हेमांग क्रिस्टियन ,श्री पूर्वेश जानी आणि त्यांची चमू यांनी मार्गदर्शन केले तसेच कार्यक्रमाच्या तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. दिप्ती रूईकर यांनी 'औषधनिर्माण क्षेत्रातील संधी व आव्हाने' यावर मार्गदर्शन केले.

कॅम्पस ड्राइव्ह मध्ये अनुक्रमे पात्रता चाचणी, वैयक्तिक मुलाखत व नंतर अंतिम फेरीत विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी अमरावती महाविद्यालयातर्फे दरवर्षी विद्यार्थ्यांकरिता या प्रकारच्या कॅम्पस प्लेसमेंट करिता नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांना महाविद्यालयात आमंत्रित करते व याचा लाभ विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर होतो.

सदर कॅम्पस ड्राइव्हचे नियोजन प्लेसमेंट व प्रशिक्षण विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ. भुषण भोयर यांनी केले तसेच कॅम्पस ड्राइव्ह च्या यशस्वी आयोजना मध्ये सर्व सहाय्यक प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांचे सहकार्य लाभले.

# जिल्ह्यात ९० टक्के मतदार मॅपिंग पूर्ण

## दर्यापूर विधानसभा मतदारसंघ सर्वात पुढे

प्रतिनिधी ९ जून

**अमरावती:** जिल्ह्यातील मतदारयाद्यांचे अचूक सक्षमीकरण आणि मतदार मॅपिंग मोहिमेने वेग घेतला आहे. ६ जून २०२६ पर्यंत जिल्ह्यातील ८ विधानसभा मतदारसंघामध्ये एकूण ८९.७२ टक्के मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले आहे. यात दर्यापूर विधानसभा मतदार संघ ९५.६९ टक्क्यांसह सर्वात पुढे आहे.

जिल्ह्यातील एकूण ८ विधानसभा मतदारसंघांपैकी दर्यापूर मतदारसंघ ९५.६९ टक्के मॅपिंगसह जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर आहे. त्यापाठोपाठ धामणगाव रेल्वे ९४.८८ टक्केसह दुसऱ्या स्थानावर आहे. अमरावती विधानसभा मतदारसंघही ८०.०६ टक्के मॅपिंगसह प्रगती करीत आहे. जिल्ह्यातील एकूण २५ लाख ५८ हजार ३६४ मतदारांपैकी २२ लाख ९५ हजार ३१९ मतदार मॅपिंग पूर्ण झाले आहेत. उर्वरित २ लाख ६३ हजार ४५ मतदारांचे मॅपिंग झालेले नाही.

नगरपालिका क्षेत्रात सरासरी ८५.१९ टक्के मॅपिंग पूर्ण झाले आहे. यात भातकुली नगरपालिका ९५.५७ टक्केसह सर्वात आघाडीवर आहे. जिल्ह्यातील मॅपिंगच्या प्रक्रियेत लक्षणीय वाढ झालेली आहे. १७ मार्च रोजी जिल्ह्याचे मॅपिंग ४६.३७ टक्के होते. यात आता जिल्हा आता ८९.७२ टक्केवर पोहोचला आहे. यामध्ये सर्वाधिक प्रगती अमरावती मतदारसंघात झाली असून, तिथली टक्केवारी २८.०३ टक्क्यांवरून ८०.०६ टक्के वाढ झाली आहे.

जिल्ह्यातील उर्वरित २ लाख ६३ हजार ४५ मतदारांचे मॅपिंग आणि त्रुटी दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येत आहे. मतदारांनीही मॅपिंगच्या कार्यात सहकार्य करावे, बीएलओंकडून मॅपिंगची प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

# १७ रोजीच्या महामोर्चाला विविध संघटना, राजकीय पक्षांचा वाढता पाठिंबा

## उपवर्गीकरण विरोधी आंदोलन कृती समितीचा एल्गार

प्रतिनिधी ९ जून

**अमरावती:** अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाच्या विरोधात उपवर्गीकरण विरोधी आंदोलन समितीच्या वतीने बुधवार(ता.१७ ) रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते जिल्हा कचेरीवर महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. मोर्चा यशस्वी करण्याकरिता रविवार(ता.सात) रोजी संबोधी: डॉ. बाबासाहेब आंबेडकर संस्कार भवन, भीम टेकडी येथे सर्वपक्षीय बैठकीत विविध समित्यांचे गठन करण्यात आले. बैठकीला विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांचा आयोजन समितीत समावेश करण्यात आला.

बुधवार १७ जून रोजी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून मोर्चाला प्रारंभ होणार असून थेट जिल्हा कचेरीवर धडकणार आहे. मोर्चात जिल्हाभरातील विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्ष, युवक संघटना, बुद्ध विहार, महिला मंडळ,



अनुसूचित जातीतील ४९ ही जातीच्या सामाजिक संघटनाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. ५० हजारांहून अधिक नागरिक सहभागी होणार असून महामोर्चा शांततेच्या मार्गाने शिस्तबद्ध पद्धतीने व्हावा याकरिता उपवर्गीकरण विरोधी आंदोलन समिती, सर्वपक्षीय,संघटनाचे कार्यकर्ते जोमाने कामाला लागले आहेत. जिल्ह्यात विविध ठिकाणी बैठका, जनजागृती अभियान आणि संपर्क दौरे सुरू आहेत. महामोर्चाला तन-मन-धनाने जनसमर्थन मिळत असल्याचे दिसून येत आहे. बैठकीला प्रा.जगदीश गोवर्धन,डॉ. संतोष बनसोड, रमेश कटके, येदुराज रामटेके, नरेंद्र उके, एस.बी नाईक,व्ही.एम. वानखडे, राजू चौथमल, शुभम कांबळे, गौरव नाईक, संजय भोवते, वाल्मीक डोंगरे, डॉ. अश्विनी गोंडाने, इंजिनीयर गोपाल इंगळे, रविकांत गवई, संदीप मेश्राम, एस.बी.खोबरागडे,मनस खाराम गजभिये, अनंत गवई, दौलत खडसे, शिवदास अढाऊ, अश्विनी गडलिंग, संजय मोकळे, रवी हजारे, चंदन नाईक, जे.एम उरकळे, अमृत काळपांडे, रमेश आकोडे, भिमराव मेश्राम, के.के. देशभ्रतार, ए.यू नाखले, पी एस कोहळे, डॉ. गोपीचंद मेश्राम, सुदाम बोरकर, प्रसन्नजीत सरदार, सतीश प्रधान, अनिल चतुर, शंकर ओंकार, एस यू फुलझेले, जीवन गडलींग, आदेश मेटांगे, शंकर सोनवणे, मोरेश्वर पवार, सुरेश तायडे, शिवा प्रधान, आनंद इंगळे, रमेशचंद्र रामटेके, एडवोकेट पी एस खडसे,हरिदास शिरसाट, माधुरी बनसोड, जया हुमणे, प्राची हुमणे, प्रोफेसर प्रेम मनोहर, रवींद्र दांडगे, अरुण मोहोळ, नारायण थोरात, एस.खोब्रागडे, एस पी बनसोड, डी. के. बागडे, ए एल गजभिये, भारत शहारे, राजेश वानखडे, नयन मोंढे यांच्या सह विविध राजकीय पक्ष सामाजिक संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

६

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

मंगळवार दि ९ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

राजकीय ॲक्टर,
स्त्रीभ्रूणहत्येचा फॅक्टर,
अविवेकी डॉक्टर ,
बोगस कॅरेक्टर...






# नावालाच तक्रार , आरोपीला वाचविण्याचा करार...

# आरोपी बेंगलोरला फरार !

## * मोबाईल लोकेशन शोधा, आरोपीला अटक करा, जनतेची मागणी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

मालेगाव येथील आरोग्य विभागाच्या वैद्यकीय अधीक्षकांनी राजाश्रय असलेल्या सत्ताधारी पक्षाच्या 'निष्ठा' वान कार्यकर्ता असलेल्या अविवेकी डॉक्टरच्या बेकायदेशीररित्या गर्भ लिंग निदान चाचणीसह स्त्री भ्रूण हत्या करणाऱ्या कथित सोनोग्राफी सेंटर वर 'सिंघम' स्टाईल धाडसी कारवाई करून अविवेकी दाम्पत्याचे काळे कारनामे उघडकीस आणून स्वतःची पाठ थोपटून घेतली आहे. परंतु ही धडाकेबाज कारवाई करतांना अविवेकी डॉक्टरच्या डॉक्टर असलेल्या आणि अविवेकी डॉक्टरच्या प्रत्येक पापात सहभागी असलेल्या 'पुरोगामी' पत्नीचे नाव 'ज्ञात' असूनही तक्रार देतांना 'अज्ञात' महिला डॉक्टर असा उल्लेख केल्याने आरोग्य व पोलीस प्रशासनाच्या कार्यप्रणालीबाबत परिसरात उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे. आरोपी बेंगलोरला फरार झाल्याची माहिती असून आरोपीचे मोबाईल लोकेशन शोधून अटक करण्याची मागणी होत आहे.







दोन आठवड्यापुर्वी मालेगाव नगरीत जगजाहीर झालेल्या अविवेकी डॉक्टरच्या माने हॉस्पीटल मध्ये खुलेआम सुरू असलेल्या बेकायदेशीर गर्भ लिंग निदान चाचणीसह स्त्री भ्रूण हत्या करणाऱ्या सोनोग्राफी सेंटरवर बोगस गर्भवती असलेल्या महिलेस पाठवून आरोग्य विभागाने टाकलेल्या कारवाईत माने दाम्पत्यासह काही दलालांची नावे समोर आलीत. आरोग्य विभागाचे वैद्यकीय अधीक्षक व त्यांची टीम ही धडाकेबाज कारवाई करण्यासाठी माने हॉस्पीटल मध्ये गेले असता त्यांनी समोरच्या दरवाजाने प्रवेश केला. माने दाम्पत्यावर कारवाईची 'विज' कोसळणार असल्याची चाहूल लागताच 'या' बेकायदेशीर कृत्यात सहभागी असलेले सर्व 'ज्ञात' आरोपी मागील दरवाजाने फरार झाल्याची चर्चा आहे. या काळ्या कृत्यात सदैव सहभागी असलेल्या अविवेकी डॉक्टरच्या 'पुरोगामी' विचाराच्या डॉक्टर असलेल्या पत्नीचे नाव सर्वांना ज्ञात असताना या प्रकरणात अज्ञात महिला डॉक्टर असा जाणूनबुजून उल्लेख केल्याची परिसरात चर्चा आहे. तर आरोपी बेंगलोरला फरार झाल्याची चर्चाही मालेगाव शहरात होत आहे. तर पोलिस आरोपीला पाठीशी घालत आहेत. त्यामुळे आरोपीचे मोबाईल लोकेशन शोधावे आरोपीला अटक करावे, अशी मागणी जनतेतून होत आहे. आता या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी मालेगाव पोलीस असमर्थ असतील तर पोलीस अधीक्षकांनी समर्थ असलेल्या एलसीबी कडे तपास सुपूर्द करून या महापापात सहभागी असलेल्या सर्व आरोपींना गजाआड करण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी विविध स्तरातून केल्या जात आहे.

## थोडक्यात

### भगवा फटा बांधण्याचा विक्रम!

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●



मंगरूळपीर येथील नवदुर्ग उत्सवाचे संस्थापक अध्यक्ष यांनी भगवा फेटा विविध कार्यक्रमांमध्ये अविरत बांधण्याचा उच्चांक गाठला असून आज सदा अन्नाच्या भगव्या फेट्याची सर्वत्र चर्चा होत आहे.

गाव खेड्यातील भगवा फेटा लोकसरी पावला असेल परंतु सदा अण्णांनी सांस्कृतिक कार्यक्रम विविध उत्सव व लग्न समारंभ मध्ये नवरदेवाच्या डोक्यावर भगव्या फेट्याचा तुला कायम ठेवला म्हणून आजही सदा अन्नाच्या फेट्यासाठी गाव खेड्यातून अनेक जण भगवा फेट्याचे मागणी करत असतात. अण्णांनी गेल्या पन्नास वर्षांपासून भगवा फेटा श्रीमंत असो किंवा गरीब यामध्ये भेद न ठेवता कायम सातत्य ठेवून भगवा फेटा कसा मानाने डोलत राहील यासाठी प्रयत्नशील असतात. सोबतच त्यांचे चिरंजीव अर्जुन आणि गोपाल सुद्धा भगव्या फेट्याची वेगवेगळ्या स्टाईल डोक्यावर कसा चढवता येईल यासाठी प्रयत्नशील असतात. म्हणून सदाअण्णाच्या फेट्याचे चर्चा सर्वत्र ठिकाणी होत असते.

### जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशनची कामे वेळेत पूर्ण करा



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत सुरू असलेल्या सर्व कामांची गती वाढवून ती गुणवत्तापूर्ण पद्धतीने आणि विहित कालावधीत पूर्ण करावीत. संबंधित अधिकाऱ्यांनी वेळोवेळी प्रत्यक्ष स्थळभेटी देऊन कामांची पाहणी करावी, प्रगतीचा नियमित आढावा घ्यावा तसेच अद्ययावत अहवाल सादर करावेत. सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.

जिल्हा जल व स्वच्छता मिशनच्या बैठकीत जल जीवन मिशन, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या नळपाणी पुरवठा योजना तसेच स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत विविध कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

## नागरिकांना आवाहन, चोरांपासून रहा सावधान!

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●



### जागृत राहा सतर्क राहा- ठाणेदार चव्हाण

सध्या परिसरात घरफोडी, शेतातील अवजारे चोरी, जनावरे चोरी, वाहन चोरी तसेच गर्दीच्या ठिकाणी पाकीटमारीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर रिसोड पोलीस स्टेशनतर्फे नागरिकांना सतर्कतेचे आवाहन करण्यात आले आहे.

पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांनी प्रसिद्ध केलेल्या जनजागृती संदेशात नागरिकांनी आपल्या घर, शेत, गोठे, वाहने व मौल्यवान वस्तूंची विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. पूर्वी स्थानिक चोरट्यांचे प्रमाण अधिक होते; मात्र आता जिल्ह्याबाहेरील व परराज्यातील टोळ्याही चोरीसाठी सक्रिय झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे. शेतकरी बांधवांनी शेती अवजारे सुरक्षित ठिकाणी ठेवावीत, शक्य असल्यास शेत व गोठ्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत तसेच कुत्रे पाळून सुरक्षा वाढवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. गावागावात ग्रामसुरक्षा दल स्थापन करून युवकांनी नियमित रात्रगस्त घालावी व कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास कायदा हातात न घेता तात्काळ डायल ११२ किंवा संबंधित बिट पोलीस अधिकारी, पोलीस पाटील यांच्याशी संपर्क साधावा, असेही सांगण्यात आले आहे. बसस्थानक परिसरात लग्नसराईमुळे वाढलेल्या गर्दीचा फायदा पाकीटमार व दागिने चोरणाऱ्या टोळ्या घेत असल्याने नागरिकांनी विशेष दक्षता घ्यावी, असेही पोलिसांनी म्हटले आहे. तसेच वाहनधारकांनी आपली वाहने लॉक करून सीसीटीव्हीच्या निगराणीखाली ठेवावीत व शक्य असल्यास जीपीएस यंत्रणा बसवून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. बाहेरगावी जाताना घरातील मौल्यवान वस्तू बँकेच्या लॉकरमध्ये ठेवाव्यात, घरासमोर सीसीटीव्ही बसवावा व शेजारी अथवा पोलिसांना माहिती द्यावी, असे मार्गदर्शनही करण्यात आले आहे. व्यापारी व दुकानदारांनी ग्राहकांवर चाणाक्ष नजर ठेवून संशयास्पद व्यक्तींची माहिती तात्काळ पोलिसांना द्यावी, असेही सूचित करण्यात आले आहे.

**आम्ही पोलीस म्हणून करतात वार नागरिकांना सतर्क रहा वारंवार...**

आम्ही पोलीस आहोत तुमची झडती घ्यायची आहे' किंवा इतर कारणे सांगून फसवणूक करणाऱ्या भामट्यांपासून सावध रहा , अशा व्यक्तींचे ओळखपत्र मागावे किंवा आरडाओरडा करून आसपासच्या नागरिकांना सतर्क करावे, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. कोणतीही संशयास्पद व्यक्ती, बेवारस वाहन किंवा चोरीसंदर्भातील माहिती मिळाल्यास नागरिकांनी निःसंकोचपणे पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांनी केले आहे.

## जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजनेत कोट्यवधीचा भ्रष्टाचार !

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

वाशीम जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजनेत कोट्यवधी रूपयाचा भ्रष्टाचार झाल्याबाबत काँग्रेस पक्षाचे तडफदार नेते तथा ब्रम्हपूरीचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात 'तारांकीत 'प्रश्न लावला आहे. हा तारांकीत प्रश्न ६ जुलै २०२६ रोजी अधिवेशनात गाजणार आहे. या तारांकीत प्रश्नाला शालेय शिक्षण मंत्री सभागृहात उत्तर देणार आहेत. या प्रश्नामुळे वाशीम जिल्ह्यातील आधीच विविध भ्रष्टाचाराने बदनाम झालेल्या शिक्षण विभागासह शालेय पोषण आहाराचा कागदोपत्री पुरवठा करणाऱ्या जगदंबा एंटरप्रायझेस, बीड या पुरवठा करणाऱ्या एजंसीच्या संचालकांमध्ये खळबळ उडाल्याचे वृत्त आहे.

वाशीम जिल्ह्यातील शालेय पोषण आहारात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरू असल्याची चर्चा होती. या प्रकरणी जागरूक नागरिकांनी शिक्षण विभागाकडे माहितीच्या अधिकारात माहिती मागितली. शिक्षण विभागाकडून मिळालेल्या माहिती मधूनच वाशीम जिल्ह्यात शालेय पोषण आहारामध्ये बोगस पावत्या दाखवून कोट्यवधीचा भ्रष्टाचार खुलेआम पुरवठा एजंसी आणि शिक्षण विभागातील भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या संगनमताने सुरू असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे.

## इरशाद अहमद यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार!

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●



शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले अथक प्रयत्न आणि शैक्षणिक व सहशालेय कार्यातील उत्कृष्ट सेवेची दखल घेत रिसोड शहरातील डॉ अल्लामा इकबाल उर्दू प्रायमरी स्कूलचे शिक्षक इरशाद अहमद मुशताक अहमद यांना यंदाचा मानाचा 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले आहे. 'बी दि चेंज फाउंडेशन' (शिर्डी, जिल्हा अहिल्यानगर) संस्थेच्या वतीने आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना हा गौरव प्रदान करण्यात आला.

दिग्गजांची सोहळ्याला उपस्थिती संस्थेच्या वतीने आयोजित या पुरस्कार सोहळ्याच्या (पर्व ४ थे) मुख्य कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील नामांकित व्यक्तींनी प्रमुख पाहुणे म्हणून हजेरी लावली होती. यामध्ये निवृत्त मेजर कर्नल सुभेदार दिनकर रतन पवार, सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री निविदिता पगारे, डॉ. प्रकाश कोडपे, बाबासाहेब कापे आणि दादासाहेब ढोकचवडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते इरशाद अहमद मुशताक अहमद यांना सन्मानपत्र आणि स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

अथक परिश्रम आणि समर्पणाचा गौरव इरशाद अहमद यांनी शिक्षण क्षेत्रात व अल्पसंख्याक समाजासाठी केलेले कार्य अतिशय प्रेरणादायी आहे. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम आणि त्यांची निष्ठा अनेक विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरली आहे.

## नव्याने डेपो मॅनेजर बोदडे आले... अन् रिसोड डेपोचे बारा वाजले !



● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

**घाणीचे साम्राज्य, बंद हिरकणी कक्ष आणि विस्कळीत व्यवस्था; रिसोड एसटी स्थानकाकडे वरिष्ठांनी लक्ष देण्याची गरज...**



नवीन डेपो मॅनेजर बोदडे यांच्या कार्यकाळात स्थानकातील स्वच्छता, प्रवासी सुविधा आणि कर्मचाऱ्यांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा आहे. मेकॅनिकल व चालकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसणे, महिलांसाठीचा हिरकणी कक्ष बंद असणे आणि संध्याकाळनंतर खासगी लक्झरी बसेस स्थानकातूनच भरल्या जाण्याच्या प्रकाराकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता असल्याचे प्रवासी व्यक्त करत आहेत.

रिसोड येथील एसटी बसस्थानकाची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असून, संपूर्ण परिसरात घाणीचे साम्राज्य पसरल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. नवीन डेपो मॅनेजर बोदडे यांच्या आगमनानंतर स्थानकातील व्यवस्थापन पूर्णपणे कोलमडल्याची चर्चा प्रवासी व कर्मचाऱ्यांमध्ये रंगू लागली आहे.

बसस्थानकावर कोणतीही वाहतूक व्यवस्था सुरळीत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अनेक गाड्या वेळेवर प्लॅटफॉर्मवर लागत नाहीत, तर एका प्लॅटफॉर्मवर बस उभी असताना दुसऱ्याच प्लॅटफॉर्मची अनाऊन्समेंट होत असल्याने प्रवाशांची मोठी धावपळ उडत आहे. दरम्यान, डेपो परिसरात सर्वत्र कचरा व अस्वच्छता असल्याने मेकॅनिकल विभागातील कर्मचाऱ्यांना घाणीच्या वातावरणात काम करावे लागत असल्याची खंत व्यक्त होत आहे. तसेच चालक व मेकॅनिकल कर्मचाऱ्यांसाठी पिण्याच्या स्वच्छ पाण्याचीही पुरेशी व्यवस्था नसल्याचे सांगितले जात आहे. महिलांसाठी शासनाच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेला 'हिरकणी कक्ष' हा उपक्रमही धूळ खात बंद अवस्थेत असल्याचे दिसून येत आहे. स्तनपान करणाऱ्या माता व लहान बालकांसाठी महत्त्वाचा असलेला हा कक्ष सुरू करण्याची मागणी महिला प्रवाशांकडून होत आहे. याशिवाय, संध्याकाळी सातनंतर खासगी लक्झरी बसेस एसटी स्थानकाच्या आवारातूनच प्रवासी भरत असल्याचे चित्र दिसून येत असून, याकडे प्रशासनाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष होत असल्याची चर्चा आहे. डेपो मॅनेजर यांच्या निवासस्थानाकडे जाणारा रस्ता अतिक्रमणामुळे अडथळलेला असल्याचेही सांगितले जात आहे. या सर्व बाबींमुळे प्रवासी, कर्मचारी आणि नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन रिसोड एसटी स्थानकातील व्यवस्थापन व स्वच्छता सुधारावी, अशी मागणी होत आहे.

## रिसोड महसूल विभाग हप्त्यापोटी झुकले...

# अवैध गौण खनिज उपशासाठी माफियांना मोकाट सोडले !



**मेहकर-मालेगाव महामार्ग मोकाट, वाळू वाहतूक सुसाट...**

मेहकर–माळेगाव महामार्गावर अवैध वाळू वाहतुकीला जणू ऊत आला असल्याचे चित्र दिसून येत आहे. रात्रीच्या वेळी ट्रॅक्टर व इतर वाहनांमधून मोठ्या प्रमाणात वाळूची वाहतूक होत असल्याची चर्चा परिसरात आहे. मात्र, संबंधित यंत्रणेकडून अपेक्षित त्या प्रमाणात कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. या अवैध वाहतुकीमुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान होत असल्याची भावना व्यक्त होत असून, संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष घालून कठोर कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.




● प्रभाकर नाईकवाडे @ रिसोड ●

**केनवड-नेतंसा येथील प्रकार**

केनवड-नेतंसा परिसरात दिवसेंदिवस अवैध गौण खनिज उपशाच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये जोर धरत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, 'दिवसा ताळमेळ... अन् रात्री चाले अवैध गौण खनिज उपशाचा खेळ!' असे चित्र सध्या परिसरात पाहायला मिळत आहे.

रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत काही ठिकाणी जेसीबी व ट्रॅक्टरच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात गौण खनिज व नदीपात्रातून वाळूचा उपसा केला जात असल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रकारामागे कथित 'हप्ता संस्कृती' कार्यरत असल्याची चर्चा परिसरात रंगू लागली आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, याच पैशांच्या व्यवहारामुळे केनवड येथील समाधान शिबीर वाऱ्यावर सोडून नायब तहसीलदार कुळमेथे हे मेहकर–माळेगाव महामार्गावर तब्बल दोन ते तीन तास वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्पर चालकांकडून पैसे वसूल करत असल्याचे दिसून आल्याचा आरोप केला जात आहे. मात्र, या गंभीर आरोपांनंतरही संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. त्यामुळे या कथित हप्ता व्यवस्थेत अनेकांची भागीदारी आहे का? असा सवाल आता सर्वसामान्यांमधून उपस्थित केला जात आहे. स्थानिकांच्या मते, वारंवार तक्रारी करूनही अवैध उपसा करणाऱ्यांवर प्रभावी कारवाई होत नसल्याने त्यांच्या मनोबलात वाढ झाली आहे. त्यामुळे 'महसूल विभागाची निष्क्रियता नेमकी कोणाच्या हितासाठी?' असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. केनवड-नेतंसा परिसरात सुरू असलेल्या कथित अवैध गौण खनिज उपशामुळे शासनाच्या महसुलाचे मोठे नुकसान होत असल्याची चर्चा असून, संबंधित विभागाकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याचाही आरोप होत आहे. परिणामी परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी संबंधित महसूल अधिकारी व प्रशासनाने तातडीने दखल घेऊन संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि शासनाच्या महसुलाची होणारी गळती रोखावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## शिवराज्याभिषेक दिन म्हणजे स्वराज्य, सुशासन आणि राष्ट्रनिष्ठेचा आदर्श !

### प्रा. महेश देवळे यांचे प्रतिपादन



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

स्थानिक जुन्या पंचायत समितीच्या सभागृहात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रा. महेश देवळे यांचे प्रेरणादायी व्याख्यान संपन्न झाले. यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे राष्ट्रनिर्माणातील योगदान, स्वराज्य स्थापनेमागील दूरदृष्टी, लोकाभिमुख प्रशासन आणि त्यांच्या कार्यातून मिळणाऱ्या प्रेरणेवर सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष गजानन भोयर, तर प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष अशोक परळीकर, वीर भगतसिंग व्यायाम शाळेचे संचालक सुरेश सोनोने, जेष्ठ विधिज्ञ ॲड.बी.एम. ठाकरे, प्रकाश धोटे, माजी केंद्र प्रमुख नागोराव खर्चे, विधिज्ञ मंडळाचे उपाध्यक्ष ॲड. मिलिंद बोलके आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष ॲड. अजय गवारगुरु यांनी केले. तर आभार मराठा सेवा संघाचे गोपाल गावंडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय तेलंग, रमेश मुंजे, वसंतराव मोरे, बंडू भगत, गजानन व्यवहारे, आदित्य दळवी, गोपाल खिराडे, अक्षय ठाकरे, गजानन जाधव, विठ्ठल गंगावणे, नितीन चव्हाण, आशिष सोनोने आदींनी परिश्रम घेतले.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
मंगळवार, दि. ९ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# शेतमोजणीच्या वादातून जीवे मारण्याची धमकी, गुन्हा दाखल

**बोरी अडगाव येथील घटना**

**खामगाव:** तालुक्यातील बोरी अडगाव येथे शेतजमिनीच्या मोजणीवरून वाद निर्माण झाल्याने दोन्ही पक्षांनी एकमेकांना शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याची तक्रार खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणी ७ जून रोजी परस्परविरोधी तक्रारींवरून गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सिद्धार्थ लक्ष्मण सुरवाडे यांनी भगवान रामकृष्ण टिकार यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, शेतमोजणीच्या खुणा त्यांच्या गैरहजेरीत लावण्यात आल्याच्या कारणावरून ७ जून रोजी अटाळी भाग-१ शिवारातील गट क्रमांक २६८ मध्ये वाद झाला. यावेळी शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप त्यांनी तक्रारीतून केला आहे.दुसरीकडे, भगवान रामकृष्ण टिकार यांनीही सिद्धार्थ सुरवाडे यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, अटाळी शिवारातील गट क्रमांक २६७ मध्ये मोजणीसाठी लावलेल्या खुणा उपटून टाकल्याच्या कारणावरून वाद निर्माण झाला.

# समृद्धीवर पुन्हा भीषण अपघात; मेहकरजवळ खासगी बस ट्रकवर आदळली; 25 प्रवासी जखमी

## ◆ पिंपरी माळी शिवारातील घटना: दोघांची प्रकृती गंभीर

प्रतिनिधी ९ जून

**डोणगाव:** समृद्धी महामार्गावरील अपघातांची मालिका थांबण्याची चिन्हे दिसत नसतानाच सोमवारी पहाटे मेहकरजवळ आणखी एक भीषण अपघात घडला. पुण्याहून नागपूरकडे जाणारी खासगी प्रवासी बस पिंपरी माळी (शहापूर) शिवारात समोरून जाणाऱ्या ट्रकच्या पाठीमागे जाऊन आदळल्याने २० ते २५ प्रवासी जखमी झाले. त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली.




सोमवारी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. प्राथमिक माहितीनुसार, बसचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने भरधाव वेगातील बसने ट्रकला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, बसच्या पुढील भागाचा अक्षरशः चुराडा झाला. अपघातानंतर बसमध्ये एकच गोंधळ उडाला. झोपेत असलेल्या अनेक प्रवाशांना धडकेचा जबर धक्का बसला, तर काही प्रवासी जागेवरून फेकले गेले. मदतीसाठी झालेला आक्रोश आणि किंचाळ्यांनी परिसर दणाणून गेला. विशेष म्हणजे, गेल्या दोन दिवसांतील समृद्धी महामार्गावरील हा अशाच प्रकारचा दुसरा अपघात ठरला आहे.समृद्धी महामार्गावर गेल्या काही महिन्यांत सातत्याने घडणाऱ्या अपघातांमुळे सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. अतिवेग, दीर्घ प्रवासामुळे येणारा चालकांचा थकवा, वाहनांमधील सुरक्षित अंतर न राखणे आणि पहाटेच्या वेळेतील निष्काळजी, ही कारणे वारंवार समोर येत आहेत. अत्याधुनिक आणि वेगवान महामार्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समृद्धीवर अपघातांची पुनरावृत्ती होत असल्याने केवळ पायाभूत सुविधा पुरेशा नसून चालकांमध्ये सुरक्षिततेबाबत अधिक जागरूकता निर्माण करण्याची गरज अधोरेखित होत आहे. या अपघाताने सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आणला आहे.

**एक-दीड तास मृत्यूच्या दाढेत अडकलेले प्रवासी!**

अपघातानंतर बसचा पुढील भाग पूर्णपणे दबल्याने काही प्रवासी बसमध्येच अडकून पडले. बाहेर पडण्याचा मार्ग बंद झाल्याने अनेकांचा जीव टांगणीला लागला होता. सुमारे एक ते दीड तास हे प्रवासी मृत्यूच्या छायेत अडकून होते. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलिस, मेहकर पोलिस, समृद्धी महामार्गाचे बचाव पथक आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या. स्थानिक नागरिकांनीही मदतीसाठी धाव घेतली. कटरच्या साहाय्याने बसचे नुकसानग्रस्त भाग कापून अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यात आले. त्यानंतर सर्व जखमींना तातडीने मेहकर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते कॉलेज ऑफ इंजीनियरिंग येथे जागतिक पर्यावरण दिन साजरा

प्रतिनिधी ९ जून

**मलकापूर:** लोकसेवा शिक्षण बहुउद्देशीय मंडळ संचलित पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, मलकापूर येथे दिनांक ५ जून २०२६ रोजी जागतिक पर्यावरण दिन अत्यंत उत्साहात आणि विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. या विशेष कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून दसरखेड एमआयडीसी येथील पोलीस विभागातील सेवानिवृत्त पीएसआय श्री. रामदास नरहरी भोजने उपस्थित होते. भोजने सर हे आपल्या शासकीय सेवेसोबतच सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनाबाबत समाजात जनजागृती निर्माण करण्यासाठी नेहमीच विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत असतात. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे



प्राचार्य डॉ. अनिल खर्चे लाभले होते, ज्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून पर्यावरणाचे रक्षण करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. याप्रसंगी प्रा. रमाकांत चौधरी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना महाविद्यालयातील गुणवत्ता वृद्धी, विविध शैक्षणिक उपक्रम आणि संस्थेमार्फत राबविल्या जाणाऱ्या पर्यावरणपूरक उपक्रमांविषयी सविस्तर माहिती दिली.

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. सचिन बोरले यांनी एनएसएस अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम आणि पर्यावरण जनजागृतीच्या विविध यशस्वी उपक्रमांचा आढावा सादर केला. याप्रसंगी मंचावर आणि कार्यक्रमास प्रा. संदिप खाचने, प्रा. प्रतिक पाटील, मो. जावेद, रमाकांत राणे आणि अनंत बऱ्हाटे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमाची सुरुवात आणि सांगता अत्यंत उत्साही वातावरणात झाली, ज्यामध्ये उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा मोलाचा संदेश देण्यात आला. या प्रसंगी 'एक विद्यार्थी – एक वृक्ष' या पर्यावरणपूरक संकल्पनेचा व्यापक प्रसार करत, प्रत्येक विद्यार्थ्याने आणि नागरिकाने किमान एक झाड लावून केवळ त्याचे रोपणच नाही तर त्याचे पूर्ण जबाबदारीने संगोपन व संवर्धन करावे, असे आवाहन मान्यवरांनी केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट आणि प्रभावी सूत्रसंचालन प्रा. कैलास कोळी यांनी केले, त्यांनी आपल्या वक्तृत्वातून पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व आणि मानवी जीवनातील झाडांचे स्थान उपस्थितांना अत्यंत सुंदररीत्या पटवून दिले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा पर्यावरण दिनाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभाग (NSS) आणि महाविद्यालयातील सर्व विभागांच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेत मोलाचे सहकार्य केले.

# विशिष्ट बियाण्यांच्या आग्रहाऐवजी उपलब्ध व शिफारस केलेल्या वाणांची निवड करा; कृषी विभागाचे आवाहन

## ◆ बियाणे खरेदीत साठेबाजी, जादा दराचा धोका!

प्रतिनिधी ९ जून

**खामगाव:** खरीप हंगाम तोंडावर आल्याने शेतकऱ्यांची बियाणे व खत खरेदीसाठी लगबग सुरू झाली आहे. यंदाही सोयाबीन, कपाशी आणि इतर खरीप पिकांच्या लागवडीसाठी शेतकरी तयारी करत असताना कृषी विभागाने महत्त्वाचे आवाहन केले आहे. शेतकऱ्यांनी विशिष्ट एखाद्या कंपनीच्या किंवा विशिष्ट वाणाच्या बियाण्यांचा आग्रह धरू नये, असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

दरवर्षी खरीप हंगामाच्या सुरुवातीला काही मोजक्या बियाणांना शेतकऱ्यांकडून मोठी मागणी असते. विशेषतः सोयाबीन व कपाशीच्या काही विशिष्ट वाणांना अधिक पसंती दिली जाते. परिणामी त्या बियाणांचा बाजारात तुटवडा निर्माण होतो.

मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी पडल्यास काही ठिकाणी कृत्रिम टंचाई निर्माण करून बियाणांची साठेबाजी केली जाते. यामुळे शेतकऱ्यांना आवश्यक बियाणे वेळेवर उपलब्ध होत नाहीत.

अशा परिस्थितीत काही विक्रेत्यांकडून बियाण्यांची विक्री निर्धारित किमतीपेक्षा अधिक दराने केल्याच्या तक्रारीही समोर येतात. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक होण्याचा धोका वाढतो. अनेक वेळा जादा किंमत मोजूनही अपेक्षित दर्जाचे बियाणे मिळेलच, याची खात्री नसते.

गुणवत्ता किंवा उगवणक्षमतेबाबत समस्या निर्माण झाल्यास तक्रार नोंदवणे सोपे होते. तसेच बियाण्यांसाठी निर्धारित दरापेक्षा अधिक रक्कम आकारली जात असल्यास संबंधित विक्रेत्याविरोधात कृषी विभागाकडे तातडीने तक्रार करावी, असेही विभागाने स्पष्ट केले आहे.

**बियाणे खरेदीवेळी पक्के बिल घेणे आवश्यक!**

शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना केवळ अधिकृत व परवानाधारक विक्रेत्यांकडूनच खरेदी करावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. खरेदी केलेल्या बियाण्याचे पक्के बिल, पावती तसेच पॅकेटवरील तपशील जतन करून ठेवावेत. यामुळे भविष्यात हवामान व मृदप्रकारानुसार बियाण्यांची निवड आवश्यक कृषी विभागाच्या माहितीनुसार, शासनमान्य व विविध हवामान तसेच मृदप्रकारांसाठी उपयुक्त असलेले अनेक बियाणे वाण बाजारात उपलब्ध आहेत. नोंदणीकृत व प्रमाणित बियाणांची गुणवत्ता निश्चित निकषांनुसार तपासलेली असते. त्यामुळे केवळ एखाद्या वाणाची प्रसिद्धी किंवा वाढती मागणी पाहून त्याचाच आग्रह धरणे टाळावे. उपलब्धता, स्थानिक परिस्थिती आणि कृषी तज्ज्ञांच्या शिफारशी लक्षात घेऊन योग्य बियाणांची निवड केल्यास उत्पादनक्षमतेत वाढ होण्यास मदत होऊ शकते, असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

# कारवाईच्या धास्तीने नांदुऱ्यात खुल्या खाद्यतेलाच्या विक्रीला 'ब्रेक'

## ◆ जळगाव जिल्ह्यातील कारवाईचा परिणाम

प्रतिनिधी ९ जून

**नांदुरा:** अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईच्या धास्तीने शहरातील अनेक घाऊक किराणा व्यापाऱ्यांनी खुल्या स्वरूपातील खाद्यतेलाची विक्री बंद केल्याचे समोर आले आहे. जळगाव जिल्ह्यात खुल्या स्वरूपात विक्री होणाऱ्या रिफाइंड सोयाबीन तेलावर कारवाई झाल्यानंतर नांदुरा शहरातील काही व्यापाऱ्यांनी सोयाबीन व पाम तेलाची खुली विक्री थांबविल्याची माहिती आहे.

सध्या विविध खाद्यतेल उत्पादक कंपन्यांकडून अर्धा लिटर, एक लिटर, पाच लिटर तसेच १५ लिटर क्षमतेच्या पॅकबंद कॅनमधून खाद्यतेल बाजारात उपलब्ध आहे; मात्र खुल्या स्वरूपातील सोयाबीन व पाम तेल हे पॅकबंद तेलाच्या तुलनेत प्रतिलिटर १२ ते १८ रुपयांनी स्वस्त मिळत असल्याने हॉटेल, रेस्टॉरंट, भोजनालये तसेच साप्ताहिक बाजारातील खाद्यपदार्थ विक्रेत्यांकडून त्याला मोठी मागणी होती. ही मागणी लक्षात घेऊन काही घाऊक व्यापारी २०० लिटर

**पॅकबंद खाद्यतेलाचीच खरेदी करण्याचे आवाहन**

महाराष्ट्राचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिलेल्या निर्देशांनुसार अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे पालन न करता खुल्या स्वरुपात खाद्यतेलाची विक्री करणाऱ्यांविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. त्यानुसार जिल्ह्यातील अन्न व औषध प्रशासनानेही अन्न व्यावसायिकांना कोणत्याही प्रकारचे खाद्यतेल खुले विक्री करू नये, असे निर्देश दिले आहेत. ग्राहकांनी केवळ पॅकबंद खाद्यतेलाचीच खरेदी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. क्षमतेच्या प्लास्टिक ड्रममधून खुल्या स्वरूपात खाद्यतेलाची विक्री करत होते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून या विक्रीला अचानक ब्रेक लागल्याने व्यापारी व ग्राहकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे.

# झाडांच्या फांद्यांमुळे वीजपुरवठ्यात अडथळे; लक्ष्मीनगरातील नागरिक वैतागले!

प्रतिनिधी ९ जून

**खामगाव:** चांदमारी रोडवरील लक्ष्मीनगर परिसरात गेल्या पाच ते सहा दिवसांपासून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी विजेचा लपंडाव सुरू असल्याने नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. उष्णतेच्या दिवसांत वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांची मोठी गैरसोय होत असल्याची तक्रार स्थानिकांनी केली आहे.

करण्यात मात्र चांदमारी परिसरातील इतर भागांमध्ये वीज तारांवर आलेल्या झाडांच्या फांद्यांची छाटणी महावितरणकडून आली आहे; लक्ष्मीनगरातील अनेक ठिकाणी अद्यापही झाडांच्या फांद्या वीज तारांना स्पर्श करत असल्याचे दिसून येत आहे. वाऱ्यामुळे या फांद्या तारांवर आदळून वारंवार बिघाड निर्माण होत असून, त्यामुळे वीजपुरवठा खंडित होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे घरगुती कामकाज विस्कळीत झाले आहे.वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी लक्ष्मीनगर परिसरातील वीज तारांलगत वाढलेल्या झाडांच्या फांद्यांची तातडीने छाटणी करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. या फांद्यांमुळे वारंवार तांत्रिक बिघाड निर्माण होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. तसेच कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे. परिसरातील वीजपुरवठा नियमित व सुरळीत राहावा यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी आहे.

**वीज लपंडावामुळे उपकरणे धोक्यात!**

लक्ष्मीनगर परिसरात रोज रात्री वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांच्या अडचणीत वाढ झाली आहे. विजेची सतत ये-जा होत असल्यामुळे घरगुती विद्युत उपकरणे खराब होण्याचा धोका निर्माण झाला आहे, तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर आणि नागरिकांच्या दैनंदिन कामकाजावरही त्याचा विपरीत परिणाम होत आहे. अनेक नागरिकांनी याबाबत संबंधित विभागाकडे तक्रारी केल्या आहेत; मात्र अद्याप कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेल्या नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण असून, तातडीने समस्या सोडविण्याची मागणी होत आहे.

# कर्जमाफीसंदर्भातील शासन निर्णयाची होळी; काँग्रेस आक्रमक

प्रतिनिधी ९ जून

**बुलडाणा:** राज्य सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफीच्या निर्णयाविरोधात जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने सोमवारी (दि.८) रोजी जयस्तंभ चौक येथे आंदोलन करण्यात आले. यावेळी शासन निर्णयाची प्रतीकात्मक होळी करून सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. आंदोलनाचे नेतृत्व जिल्हाध्यक्ष प्रकाश अवचार यांनी केले.

यावेळी प्रकाश अवचार यांनी सरकारच्या कर्जमाफी योजनेवर तीव्र टीका केली. ही योजना शेतकऱ्यांसाठी दिलासा नसून, निव्वळ दिखावा असल्याचा आरोप त्यांनी केला. शासनाने घातलेल्या विविध अटी व शर्तीमुळे ५० टक्क्यांहून अधिक शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. सरकारने कोणताही भेदभाव न करता सर्व शेतकऱ्यांचा सातबारा सरसकट कोरा करावा, अशी मागणी त्यांनी केली.

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित व थकीत झालेल्या कर्जानाच लाभ देण्याची अट घालण्यात आल्याने अनेक जुन्या थकीत कर्जदार शेतकरी या योजनेबाहेर राहणार असल्याचे अवचार यांनी स्पष्ट केले. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही अत्यंत तुटपुंजा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येत असल्याने सरकारने प्रामाणिक शेतकऱ्यांवर अन्याय केल्याचा आरोप त्यांनी केला.

सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास आगामी काळात अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही जिल्हाध्यक्ष प्रकाश अवचार यांनी दिला. आंदोलनात डॉ अरविंद कोलते, डॉ स्वाती वाकेकर, प्रकाश शेगोकार, डॉ. ईसरार जमादार, दत्ता काकस, प्रमोद पाटील, कलीम खान, प्रदिप देशमुख, आश्रृ फुके, स्वप्नील ठाकरे सहभआगी झाले होते.

# भाड्याचे घर रिकामे करताना घरातील साहित्य लंपास

## ◆ भाडेकरुविरुद्ध शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

प्रतिनिधी ९ जून

**खामगाव:** शहरातील केला पोस्ट ऑफिस परिसरात भाड्याने राहणाऱ्या व्यक्तीने घर रिकामे करताना खोलीतील इलेक्ट्रिक साहित्य व इतर वस्तू चोरून नेल्याप्रकरणी खामगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

निळकंठ सदाशिव शास्त्री (८१, रा. केला पोस्ट ऑफिसजवळ, खामगाव) यांनी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीवरून नितीन अर्जुन हिरळकर (३५, रा. घाटपुरी, खामगाव) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३२४(४) व ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादींच्या घराच्या मागील बाजूस असलेल्या हॉलमध्ये विभागणी करून तयार करण्यात आलेल्या खोलीत आरोपी मागील तीन वर्षांपासून कुटुंबासह

भाड्याने राहत होता. दरम्यान, २० मे २०२६ रोजी फिर्यादी बुलढाण्याला गेले असताना आरोपीने खोली रिकामी करून साहित्य हलविले. फिर्यादी घरी परतल्यानंतर त्यांच्या पत्नीने भाडेकरू खोली खाली करून गेल्याची माहिती दिली. यानंतर खोलीची पाहणी केली असता, इलेक्ट्रिक फिटिंग, स्विच बोर्ड, सिलिंग फॅन, तसेच आरोपीच्या वापरासाठी बसविण्यात आलेले इलेक्ट्रिक सबमीटर व त्याची वायर गायब असल्याचे आढळून आले, तसेच खोलीबाहेर ठेवण्यात आलेल्या दोन लोखंडी ग्रिल आणि एक लाकडी बेंचही दिसून आली नाही.

याशिवाय नळाला जोडलेले पाइप काढून नुकसान केल्याचेही तक्रारीत नमूद केले आहे. चोरीस गेलेल्या साहित्याची अंदाजे किंमत २० हजार ५०० रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. याप्रकरणी ७ जून रोजी गुन्हा नोंदविण्यात आला.

# पशुखाद्याचे दर गगनाला, दुधाचे दर स्थिर; पशुपालक संकटात!

## ◆ ढेपीचे दर चार वर्षांत २८ वरून ४२ रुपयांवर!

प्रतिनिधी ९ जून

**खामगाव:** मागील काही वर्षांपासून जिल्ह्यातील दूध उत्पादक शेतकरी आणि पशुपालक दुहेरी संकटाचा सामना करत आहेत. काही वर्षांपूर्वी प्रति किलो २८ रुपयांना मिळणारी ढेप आता तब्बल ४२ रुपयांवर पोहोचली आहे. दुसरीकडे, दुधाला मिळणारा दर मात्र ६० ते ७० रुपये प्रतिलिटरच्या आसपास स्थिर आहे.

सध्या बाजारात गव्हाचे दर घसरलेले असताना पशुखाद्याच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे दुभत्या गुरांच्या संगोपनाचा वाढता खर्च भागवताना कुटुंबाच्या पशुपालकांसमोर उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पशुखाद्याच्या दरातील भरमसाठ वाढ आणि त्या तुलनेत दुधाला मिळणारा अपुरा दर, यामुळे दुग्धव्यवसाय आर्थिकदृष्ट्या परवडेनासा झाला असून, अनेक पशुपालकांना तोट्यात व्यवसाय चालवावा लागत आहे.

या आर्थिक गणितामुळे मेटाकुटीला



आलेल्या शेतकऱ्यांनी जनावरांचा सुका व ओला चारा कमी केला असून, याचा थेट परिणाम दुधाच्या उत्पादनावर झाला आहे. जिल्ह्यातील दुधाचे उत्पादन आता झपाट्याने घटत असल्याचे चित्र आहे.दूध उत्पादक शेतकरी केवळ खाद्याच्या दरवाढीनेच त्रस्त नाही, तर वाढलेले पेट्रोलचे दर आणि गाई-म्हशींच्या उपचाराचा खर्च यामुळेही पुरता बेजार झाला आहे.

जनावरांच्या डॉक्टरांची फी, महागडी औषधे आणि दूध संकलन केंद्रापर्यंत फेरी मारण्यासाठी लागणारे इंधन यामुळे दैनंदिन खर्च दुप्पट झाला आहे. मात्र, इतकी महागाई वाढूनही दुधाच्या मूळ खरेदी किमतीत कोणतीही वाढ होत नसल्याने पशुपालक रात्रं-दिवस चिंतातुर आहे.

**भविष्यात ग्राहकांना दूध मिळणे कठीण?**

पशुखाद्याचे दर जर याच गतीने वाढत राहिले आणि शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान थांबले नाही, तर अनेक पशुपालक हा व्यवसाय बंद करण्याच्या मनःस्थितीत आहेत. शेतकऱ्यांनी दुग्धव्यवसायातून पाठ फिरवल्यास आगामी काळात सर्वसामान्य ग्राहकांना चहा आणि रोजच्या वापरासाठी दूध मिळणेसुद्धा कठीण होईल, अशी भीती आता व्यक्त केली जात आहे.

**दुधाची भेसळ वाढणार?**

जर अशाच प्रकारे पशुखाद्याचे दर वाढत राहिले तर येत्या काळात दुधात भेसळ होण्याची शक्यता आहे. त्याचप्रकारे दिवसेंदिवस गुरांची संख्याही कमी होत आहेत. दुधाची भेसळ रोखण्यासाठी दुधाच्या दरातसुद्धा वाढ करणे महत्त्वाचे आहे. सध्या वाढत्या महागाईने दूध उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
मंगळवार, दि. ९ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# एस.आर.पाटील पाडण्यासाठी पुन्हा मागितला पोलिस बंदोबस्त...

प्रतिनिधी ९ जून

**अकोला :** विदर्भ ग्रामीण शिक्षण संस्थेचे सव्वातीनशे चौरस मीटर अनधिकृत बांधकाम पाडण्याचा ठेका दिला गेला. पण, ते अनधिकृत बांधकाम का पाडले नाही असा प्रश्न आता विचारला जात आहे. या विषयावर महापालिकेचे पदाधिकारी यांनी चुप्पी साधली आहे. याचचा अर्थ वरिष्ठ स्तरावर अनधिकृत बांधकामे वाचविण्याच्या हालचालींना वेग आला आहे. तर झोन अधिकारी देविदास निकाळजे यांनी पुन्हा पोलिसांना बंदोबस्त मागितला असून त्यांनी बंदोबस्त दिल्यानंतर हे अनधिकृत बांधकाम पाडले जाईल असे त्यांनी स्पष्ट केले.



गेल्या काही वर्षांपासून विशेषतः मागील वर्षात केवळ शैक्षणिक सत्र सुरु आहे या कारणासाठी एस आर पाटील महाविद्यालयाचे अतिक्रमण पाडणे थांबले होते. पण, शैक्षणिक सत्र संपले, कारवाईचा आदेश झाला, कंत्राटदाराला काम दिले गेले. पण,४ जुन रोजी एस. आर. पाटील महाविद्यालयाचे अतिक्रमण,अनधिकृत बांधकाम मात्र पाडले गेले नाही. २४ तासांची नोटीस बजावून मनपाची फौज सज्ज झाली होती.

पण, कारवाई टाळल्या गेली. सहकार नगरातील हरिश- अश्विन कॉलनी येथील एस आर पाटील महाविद्यालयाच्या अनधिकृत बांधकाम पाडण्यास कोण्या पदाधिकाऱ्याने नकार दिला अशी विचारणा होत आहे. अकोला नगर परिषदेने विदर्भ ग्रामीण शिक्षण संस्थेला केवळ १४१ चौ.मी.बांधकाम मंजुरी दिली होती. पण, त्यांनी मंजुरीपेक्षा ३२४ चौ.मी.एवढे अतिरिक्त व अनधिकृत बांधकाम केल्याचे महापालिकेने सिध्द केले आहे. भुखंडावर रहिवासी भागासाठी असलेले आरक्षण असताना शाळा उभारण्यात आली. हे अतिक्रमण पाडण्यासाठी पुन्हा एकदा झोन अधिकाऱ्यांनी तयारी दाखविली आहे. त्यांनी बंदोबस्तासाठी खदान पोलिसांना पत्र लिहिल्याचे देखील स्पष्ट केले आहे. आता पोलिस च्या कोर्टात हा विषय गेला असून अवैध व अतिक्रमण पाडण्यासाठी बंदोबस्त मिळतो की नाही.

### पोलिस बंदोबस्त मिळणार की नाही

खदान पोलिस स्टेशन हद्दीत हे अतिक्रमण पाडण्याचे काम आहे. त्यासाठी खुप मोठा पोलिस बंदोबस्त लागणार नाही. खदान पोलिस खुप कामात असतील तर शहरातील इतर ठाण्यातील पोलिस देत पोलिस बंदोबस्त दिला जाऊ शकतो. फक्त यंत्रणेची इच्छा पाहिजे. असे मत अकोलेकर व्यक्त करत आहे. पोलिसांना अनधिकृत, अवैध इमारत पाडण्यासाठी बंदोबस्त द्यायचा नसेल तर काहीच होऊ शकत नाही असा कयास अकोलेकर लावत आहे.

# गॅस दरवाढीने बिघडले अनेक कुटुंबांचे गणित

◆ घरगुती खर्च वाढत असल्याच्या गृहिणींच्या तक्रारी

प्रतिनिधी ९ जून

**अकोला :** घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात तीन महिन्यात दुसऱ्यांदा वाढ झाली आहे. सात जून रोजी झालेल्या २९ रुपयाच्या दरवाढीनंतर घरगुती वापराचे सिलेंडर शहरात ९६२ रुपयांना मिळू लागले आहे. मार्च महिन्यापासून घरगुती सिलेंडरचे दर वाढतच आहेत. गॅसच्या दरवाढीमुळे अनेक कुटुंबाचे गणित बिघडू लागले आहे. पेट्रोल डिझेलच्या दरवाढीच्या पाठोपाठ सिलेंडरही महाग झाल्यामुळे घरगुती खर्च वाढत असल्याची प्रतिक्रिया गृहिणींमधून व्यक्त केली जात आहे. गॅस सिलेंडर आणि पेट्रोल व डिझेलचे भाव वाढल्याने गेल्या काही महिन्यांपासून खाद्यपदार्थ, भाजीपाला, आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीमध्ये वाढ होत असल्याने सर्वसामान्यांचे जगणे मुश्किल झाले आहे. तीन महिन्यात झालेल्या एकूण ८९ रुपयाच्या दरवाढीमुळे सर्वसामान्यांच्या घराच्या बजेटवर थेट परिणाम होत आहे. कमी उत्पन्नात खर्चात काटकसर कुठे करावी असा प्रश्नही काहीजणांच्या समोर उभा राहिला आहे. विशेषता स्वयंपाकासाठी पूर्णपणे गॅसवर अवलंबून असलेल्या कुटुंबांना या दरवाढीचा मोठा फटका बसत आहे. त्यात इंडक्शन वापरावे तर विजेचे बिल परवडत नाही अशी स्थिती शहरी भागात राहणाऱ्या कुटुंबांची झाली आहे.

### बुकिंग केल्यावरही लवकर मिळत नाही गॅस

◆गॅस कंपन्यांनी सिलेंडर बुकिंग साठी लागू केलेली लॉक प्रणाली अद्याप कायम आहे सिलेंडरची डिलिव्हरी झाल्यानंतर २५ दिवसांनी पुढील सिलेंडरची मागणी नोंदवता येते ओटीपी शिवाय सिलेंडर मिळत नाही असे असतानाही बुकिंग केल्यावर अनेकांना वेळेवर सिलेंडर मिळत नसल्याच्या तक्रारी येत आहेत.

### मोदी सरकारने एलपीजीचे दर कमी करावेत

◆मोदी सरकारने तातडीने घरगुती एलपीजीचे दर कमी करावेत दरवाढीमुळे अतिरिक्त खर्चाचा बोजा वाढत आहे महागाईने जगणे मुश्किल झाले आहे

**सौ गायत्री खरसाने** गृहिणी

◆पेट्रोल डिझेलच्या किमती वाढल्याने महिन्याचा किराणा खर्च ३०० ते ४०० रुपयांनी वाढला आहे आता गॅस सिलेंडरचे दर वाढल्याने सर्वसामान्यांचे आर्थिक बजेट बिघडत आहे.

**ज्ञानेश्वरी गावंडे** युवती

# मुख्य रस्त्यावरील अतिक्रमणावर कारवाई

प्रतिनिधी ९ जून

**अकोला :** महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत असलेल्या बहुतांश मुख्य रस्त्यालगत स्थायी/अस्थायी स्वरुपाचे अतिक्रमण झाले असल्याबाबत निदर्शनास आले आहे. सदरहू अतिक्रमणामुळे मुख्य रस्त्यावरील रहदारीस अडथळा निर्माण होऊन मोठ्या प्रमाणात वाहतुकीस कोंडी निर्माण होत असून मनपा आयुक्त यांच्या आदेशान्वये तसेच मनपा सहा.आयुक्त गणेश शहाणे यांच्या मार्गदर्शनात ८ जून रोजी मनपा क्षेत्रातील उत्तर झोन स्थित असलेल्या खुले नाट्य गृह ते इंदौर गल्ली ते फतेह चौक पर्यंतचे वाहतुकीस अडथळे निर्माण करणा-या कच्चे व पक्क्या स्वरूपाचे अतिक्रमणावर मनपा अतिक्रमण निर्मुलन पथकाव्दारे पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

या कारवाईत सिटी कोतवाली पोलीस स्टेशनचे ठाणेदार संजय गवई, सहा.अतिक्रमण अधिकारी प्रवीण मिश्रा, चंद्रशेखर इंगळे, कनिष्ठ अभियंता नरेश कोपेकर, राहूल राऊत, संतोश भगत, रूपेश इंगळे, गुलाम मुस्?तफा, बंटी सावंग, कुणाल साहू, अमित सरदार यांचेसह पोलीस कर्मचा-यांची उपस्थिती होती.



# राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाने जप्त केला 3 लाख 14 हजारांचा मुद्देमाल

प्रतिनिधी ९ जून

◆ २९ मे ते ७ जूनदरम्यान राबविली मोहीम

**अकोला :** राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाने जिल्ह्यात हातभट्टयांविरूद्ध मोहिम राबवून ३ लाख १४ हजार रू. चा मुद्देमाल जप्त केला. मेथेनॉल मिश्रित विषारी मद्य प्राशनामुळे सुमारे २० नागरिकांचा मृत्यू झाल्याची गंभीर घटना नुकतीच पुण्यात घडली. अशा प्रकारच्या घटना भविष्यात घडू नयेत, यासाठी राज्य उत्पादन शुल्क जिल्हा अधीक्षक सीमा झावरे यांच्या नेतृत्वात २९ मे ते दि.७ जून दरम्यान मोहिम राबविण्यात आली.

कार्यक्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली वेगवेगळी पथके तयार करून अनधिकृत हातभट्टी विरोधात वेगवेगळ्या ठिकाणी कारवाई करण्यात आली. यामध्ये वेगवेगळ्या पथकांच्या नेतृत्वात खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली. एकूण गुन्हे प्रकरणांत ३ लक्ष १४ हजार ७२० रू. चा मुद्देमाल जप्त झाला. आरोपींवर महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ अंतर्गत कलम ६५ ई आणि कलम ६५ एफ अंर्तगत कारवाई करण्यात आली. हातभट्टीसाठी वापरण्यात येत असलेला सडवा व वापरण्यात येत असलेले इतर साहित्य जागीच नष्ट करुन राज्य उत्पादन शुल्क विभाग अकोला मार्फत अनधिकृत हातभट्टी मद्यसेवनाने होणाऱ्या नुकसानांबद्दल नागरीकांमध्ये जनजागृती करण्यात आली. तसेच अवैध मद्यसेवनाने आरोग्यावर आणि समाजमनावर होत असलेल्या विपरीत परिणामांबद्दल नागरीकांना राज्य उत्पादन शुल्क विभाग अकोला मार्फत माहीती देण्यात आली.




# गुणवंत व्यक्तींच्या कर्तृत्वामुळे विकास कार्यास मोठा हातभार : ना. आकाश फुंडकर

प्रतिनिधी ९ जून

**अमरावती :** समाजातील गुणवंतांच्या कर्तृत्वामुळे विकास कार्यास मोठा हातभार लागत असतो. त्यामुळे अशा व्यक्तिमत्त्वांचा गौरव करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिलीच पाहिजे, असे प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर यांनी केले. दर्यापूर तालुक्यातील शिंगणापूर येथील काळा मारुती संस्थांन मध्ये आयोजित सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. अकोल्याच्या बी. जी. ई. सोसायटीचे अध्यक्ष ?ड. मोतीसिंग मोहता, अकोला वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. जयराज कोरपे, 'वत्सल' हॉस्पिटलचे संचालक डॉ. नरेंद्र भागवत, अकोला अर्बन बँकेचे माजी अध्यक्ष रामेश्वर फुंडकर, उद्योगपती रमेश वानखडे यांचा आकाश फुंडकर व अतिथींच्या हस्ते शाल, श्रीफळ व मारुतीरायांचा फोटो देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार गजाननराव दाळु गुरुजी तर प्रमुख अतिथी म्हणून आमदार प्रतापराव अरसड, माजी आमदार नारायणराव गव्हाणकर, बबनराव चौधरी,




वसंतराव खोटरे, काळा मारुती संस्थांचे अध्यक्ष प्रदीप देशमुख, उपाध्यक्ष रावसाहेब भटकर उपस्थित होते. याप्रसंगी विचार मंचावर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रमोद देंडवे, दत्तात्रय नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष जगदीश मुरूमकार, आयोजन समितीचे अध्यक्ष प्रा. राहुल खंडारे, कार्यक्रमाचे आयोजक अण्णाभाऊ टाले, नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड चे अध्यक्ष प्रदीप खाडे, छावा संघटनेचे जिल्हाप्रमुख शंकरराव वाकोडे, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष किशोर भाऊ मांगटे, भाजपा नेते बाळासाहेब हिंगणीकर, भाजपाचे अमरावती जिल्हा उपाध्यक्ष मदन भाऊ बायस्कर, भाजप नेते संजय चौधरी, पाटील समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा वैशाली बहाकार, सचिव ॲड. दिपाली जानोरकर, नगरसेविका उषाताई विरक, शिवसेना महिला आघाडीच्या देवश्री ठाकरे, जिल्हा बँकेचे संचालक डॉ. अभिषेक तिडके, नेत्रतज्ञ डॉ. सुनील चव्हाण, नगरसेवक आशिष पवित्रकार प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रारंभी दीप प्रज्वलन व हनुमंतरायांच्या फोटोचे पूजन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. जयश्री भटकर, वंदना बनसोड, अंजली बेलसरे, रेखा खलोकर यांनी स्वागत गीत सादर केले सत्कार समितीचे अध्यक्ष प्रा. राहुल खंडारे, आयोजक अण्णाभाऊ टाले, ओमप्रकाश दाळु, मुकेश गव्हाणकर, विनोद अंबुसकर, ॲड. पप्पू मोरवाल, आशिष पवित्रकार, ॲड. राहुल इंगळे, ॲड. विलास बेले, नगरसेवक अभय खुमकर, विजय इंगळे, पंकज देशमुख यांनी अतिथींचे स्वागत केले. ना. आकाश फुंडकर यांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजक अण्णाभाऊ टाले यांचे हस्ते, गजाननराव दाळु गुरूजी यांचा सत्कार प्रा. राहुल खंडारे यांचे हस्ते तर आमदार प्रतापराव अडसड यांचा सत्कार ओमप्रकाश दाळु यांचे हस्ते करण्यात आला. याप्रसंगी ॅन्ड. मोतीसिंग मोहता, गजाननराव दाळु गुरुजी, प्रदीप देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. राहुल खंडारे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन प्रदीप खाडे यांनी तर आभार प्रदर्शन मुकेश गव्हाणकर यांनी केले.




# आता दाढी कटिंग साठी मोजावे लागणार ज्यादा दाम

प्रतिनिधी ९ जून

◆ सलून सेवा २० टक्के होणार महाग

**अकोला :** अमेरिका इजराइल इराण युद्ध सुरू झाल्यापासून इंधनापासून ते खाद्यपदार्थांपर्यंत महागाईची झळ पोहोचली आहे. गॅस, पेट्रोल, डिझेल, खाद्यपदार्थ, प्रवास खर्च आदींमध्ये मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे जगणे मुश्किल झाले आहे. अशातच आता सलून चालकांनी भाव वाढवल्याने दाढी कटिंग करने सुद्धा महाग होणार आहे. महाराष्ट्र नाभिक महामंडळाने सलून सेवांच्या दरात २०३दरवाढ केल्याचे जाहीर केले आहे. याबाबत महामंडळाने प्रसिद्धिस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की नाभिक समाज आज स्वतःच्या अस्तित्वासाठी संघर्ष करत आहे, सलून व्यवसाय गेल्या काही वर्षात वाढती महागाई, आर्थिक मंदी, आणि वाढत्या खर्चाच्या ओझ्याखाली अक्षरशः दबला गेला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नाभिक महामंडळाने राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील सलून सेवांच्या दरांमध्ये २० टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ही दरवाढ ६ जून २०२६ पासून लागू करण्यात आली आहे.



### सलून चे भाव वाढण्यामागे युद्धाचे कारण

अमेरिका इराण युद्धाची धग थेट सलून दुकानापर्यंत पोहोचली आहे. इंधन दराच्या वाढीचा फटका सलून व्यवसायाला सुद्धा बसला आहे. खर्च वाढल्यामुळे बाजारातील प्रत्येक वस्तू महाग झाली आहे. सलून व्यवसायासाठी लागणारे शाम्पू, हेअर कलर, ब्लीच, फेशियल, क्रीम, जेल, वॅक्स, डिस्पोजेबल वस्तू, टॉवेल धुण्याचे साहित्य, निर्जंतुकीकरणासाठी लागणारे पदार्थ, आणि इतर अनेक वस्तू पेट्रो केमिकल उद्योगाशी संबंधित आहेत. त्यामुळे इंधन दरवाढीचा थेट परिणाम या वस्तूंवर झाला आहे. लॉरियल, वेला, श्वाड्र्सकॉफ, गोदरेज यासारख्या नामांकित देशी-विदेशी कंपन्यांनी गेल्या काही काळात त्यांच्या उत्पादनांच्या किमतीमध्ये मोठी वाढ केली आहे. त्यामुळे सलून च्या सेवांमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने आता दाढी कटिंग करण्यासाठी नागरिकांना आता खिसा सैल करावा लागणार आहे.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK